December 2013

December 31

विश्वात घटना घडत नाहीत कारण एका स्थिर बिंदूतून पाहणेच नाही -- नुसता एक अमर्याद प्रवाह ! माणूस एका स्थिर बिंदूतून पाहात असल्याने त्याला, वर्षअखेर आणि वर्षारंभ आणि इतर अनेक कालबिंदू घटना वाटतात ! -- हेच असेल का सुखदुःखाचे मूळ ?

December 30

जपून चालणे आणि जपून चालवणे बरे !

Champra Deshpande shared Dead Beats Literary Blog's photo.

'I think we ought to read only the kind of books that wound and stab us. If the book we are reading doesn't wake us up with a blow on the head, what are we reading it for?' -- Franz Kafka

December 28

स्वतःच्या आवडीचे क्षेत्र ओळखून, जगण्यासाठी कामाचे तेच क्षेत्र निवडून जगणाऱ्यांची टक्केवारी खूपच कमी असणार ! पोटापाण्यासाठी दुसरेच काही आयुष्यभर करत राहणारेच जास्त ! असे जगावे लागण्याला मानसिक निर्बीजीकरणयुक्त जगणे का म्हणू नये ?

December 27

दुधात भेसळ करायचे गुन्हेगारी उद्योग करत बसण्यापेक्षा गायीम्हशींना चाराच भेसळीचा द्यायचा ना, म्हणजे आपोआप भेसळीचे दूध मिळेल आणि तो गुन्हाही धरला जाणार नाही -- एका निरपराध म्हणजे इनोसंट मनात आलेला विचार !

December 26

Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's status update.

|| सस्नेह आमंत्रण ||

स्व. विलासराव देशमुख फाउंन्डेशन आयोजित

पु.ल देशपांडे नाट्य महोत्सव २०१३ - २०१४, लातूर

अभिनय, कल्याणची निर्मिती

"ए, आपण चहा घ्यायचा?" आणि "लेझीम खेळणारी पोरं"

उद्या दि. २८ डिसेंबर सकाळी १० वा आणि सायं. ७ वा.

दगडू दादाजी देशमुख रंगमंदिर, मार्केट यार्ड, लातूर.

( अहो, साध्या शेताच्या बांधावरूनही वाद आणि भांडणे असतात, तर शेजारी राष्ट्रांत सीमेवरून भांडणे असणारच ! ) समजा दोन शेजारी राष्ट्रांत सीमावाद आहे, तरीही, त्यासाठी पूर्ण संबंध नष्ट न करता, दोघांत व्यापार, सांस्कृतिक देवाण-घेवाण इत्यादी चालू ठेवणे, सर्वांच्याच हिताचे असते ! तसेच दोन व्यक्तींत समजा अमुक एका कारणाने भांडण आहे, तर तेवढे त्या कारणाचे क्षेत्र सीमाबद्ध करून इतर सगळे संबंध नॉर्मल ठेवता यावेत !

December 25

Champra Deshpande posted something via Change.org.

महाराष्ट्र सरकार: मराठी अभ्यास केंद्राने दिलेल्या प्रस्तावानुसार मराठी भाषा विभागाचे सक्षमीकरण - Sign the Petition!

Champra Deshpande just signed this petition on Change.org.

मराठी ही जगातल्या निवडक महत्त्वाच्या भाषांपैकी एक असून अत्यंत सक्षम अभिव्यक्तीची भाषा आहे. ती जगवली तर पाहिजेच पण तिचा प्रवाही विकासही होत राहिला पाहिजे. मराठी माणसाचे हे विचाराचे आणि जग समजून घेण्याचे माध्यम आहे. ते सशक्त राखले गेलेच पाहिजे.

December 23

हसा म्हटल्यावर हसलेलेच फोटो जास्त
खरे हास्य असलेले खूप कमी
-- जगणे फोटोजिनिक !

संध्याकाळच्या वेळी झाडांच्या पानांवर पडलेली सुंदर सूर्यकिरणे ! -- मुळात, मी सुंदर म्हणावे म्हणून हे घडत नाही -- आणि मुख्य म्हणजे सामान्यतः माझे त्यांच्याकडे लक्षच जात नाही ! -- मी माझ्या मानसिक घडामोडींत व्यग्र असतो !

December 21

भीड आणि भिडस्तपणा -- माणुसकी, ढोंग, शाप, वरदान, रोग की आरोग्य ?

December 20

कोणतेही नाते ही एक प्रवाही गोष्ट असते -- ते कायम एकाच डिझाईनमध्ये गोठून राहात नाही. संबंधित मने, त्यात होणारे बदल समजून घेणारी, सजग असली, तरच ते जिवंतपणे टिकू शकते !

जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीशी संतापून वागता आणि लगेचच, आपले वागणे बरोबर आहे का, या शंकेने ग्रस्त होता, तेव्हा समजा की, ती तुमच्या आयुष्यातली खास प्रेमाची व्यक्ती आहे !

December 19

आपले मन लवचिक असेल तरच आपल्याला दुसऱ्याचे मन थोडेफार समजू शकते आणि हे असे असेल तरच, दुसऱ्याला उगीचच न दुखवता आपल्याला वागता / बोलता येते.

December 18

मला फ्रेंड रिक्वेस्ट येण्याचे आणि मी दुसऱ्यांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवण्याचे एकूण स्वरूप पाहिले तर अंदाजे पुरुष १० ः स्त्री ०१ -- असेच आहे ! का म्हणून मी भरपूर स्त्रियांना रिक्वेस्ट पाठवत नाही ? माझ्या मनात तरी कुठे आहे समता ? भीती, अपराधी भावना, कोण काय म्हणेल -- हे सगळे असणार ! आणि मी मराठीतला एक बरा लेखक समजला जातो !

December 17

" असे वागण्याबोलण्याने गैरसमज आणि वाद होतात तर तशा शक्यता बंदच करेन -- असे म्हणत म्हणत, एकेक सहभाग, कृती कमी कमी करत नेत -- तुम्हाला अदृश्य व्हायचेय की काय ? अशी टाळाटाळी करत जगता येईल ? त्यापेक्षा, दुसऱ्यांची मने समजण्यासाठी स्वतःचे मन खुले ठेवावे, हे तुम्हाला समजत नाही ? " -- मीच एका ठिकाणी उच्चारलेला संवाद ! ( या बाबतीत मीही काही पूर्ण ' योग्य ' वाला असतो, असेही नाही !)

December 16

स्वभावाचा सबंध येत नाही तोवर प्रत्येक व्यक्ती छानच वाटते !

December 15

स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता -- हे विषय आता वातावरणात सतत असतातच आणि अजूनही हे कुठेच का नीट अंमलात येऊ शकलेले नाही, हाही विचार त्रास देत असतोच. या मार्गाने पाहू जाता, एक विचार आला, कदाचित वेडेपणाचाही असेल, तो मांडावा, असे वाटते. स्त्रीची आणि पुरुषाची शरीररचना आणि शारीरिक शक्ती, मेंदू आणि तो वापरण्याची पद्धत, शरीरातली आणि मेंदूतली मन घडायला उपयुक्त रसायने, समजून घेण्याच्या आणि प्रतिक्रिया देण्याच्या पद्धती – या सगळ्यांत फरक आहेत. तथाकथित संस्कृतीने आणि दडपशाहीने स्त्रीला लावलेल्या मानसिक सवयी, हा एक वेगळाच मुद्दा आहे. त्याबद्दल बोलत नाहीय. मला असे वाटते की ही संस्कृतीची आणि भौतिक वाढ, प्रगती ही मुख्यतः पुरुषाच्या मेंदूने घडवलेली आहे. तिच्याशी जमवून घेत स्त्रीला तिचे स्थान निर्माण करत बसावे लागते. आता पुरेशा प्रमाणात स्त्रिच्या शिकल्या आहेत / शिकत आहेत. तर त्यांनी त्यांच्या मेंदूला अनुकूल, त्यांच्या शक्ती महत्त्वाच्या ठरतील, असे काही शोधत राहिले पाहिजे. त्यातून निर्माण होणाऱ्या प्रगतीचा एक जोरकस प्रवाह या सध्याच्या संस्कृतीला पोषक आणि अटळ ठरला पाहिजे. सध्या समतेच्या चळवळी या पुरुषाच्या मेंदूशी जमवून घेत चालल्यामुळे त्यांचे नीट यश दृष्टिपथात येत नाही.

स्त्रीच्या वेगळ्या कुवतीतून ‘ प्रगती ‘ व्हायला हवी. याचा अर्थ सध्याचे प्रयत्न कुचकामी आहेत असे नव्हे, तर या एका वेगळ्या मार्गाच्याही शक्यता स्त्रियांनी शोधत राहिले पाहिजे, असे वाटते.

December 12

स्वतःला आवडणाऱ्या स्त्रीचा नकार समजुतदारपणे पचवण्याची मानसिक ताकद ज्या पुरुषात नाही, त्याला कमकुवतच म्हणायला हवे ! तुम्ही समजुतदार असाल तर स्त्री तुम्हाला एखादी चूक माफ करते !

December 11

महंमद रफी -- काला बाजार -- ' अपनी तो हर आह एक तूफान है । ' -- महाग्रेट गाणे ! व्द्यर्थी गाण्यांमधले भारतातले सम्राटपद या गाण्याला ! वाफेच्या इंजिनाची गाडी. खाली देव आनंद आणि त्याच्या समोरच्या बाकावर वहिदाचे आईवडील. देवच्या वरच्या बर्थवर वहीदा ! पूर्ण गाणे, म्हटले तर परमेश्वरासाठी आणि म्हटले तर वहीदासाठी ! दोन्ही अर्थ अति-सफाईदार ! तिचे आईवडील खुश, वहीदा खुश आणि देव तर खुशाच खुश ! पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावर सतत स्मित ठेवणारे हे एक दैवदुर्लभ गाणे ! ( तसेच ' तीसरी कसम ' मधले ' लाली लाली डोलिया में ' -- तीन मिनिटे वहीदा नुसती हसते आहे ! जान कुर्बान करावी, असे हास्य म्हणतात, ते हेच ! -- हे इथे असंबद्ध असले तरी वहीदामुळे आठवले, म्हणून सांगितले ! )

कोणतीही पार्टी छोटी असते तोवर ती ' पार्टी विथ ए डिफरन्स ' -- भ्रष्टाचारमुक्त वगैरे असू शकते -- तीच पार्टी मोठी, समावेशक झाली की तिचे हे बिरुद गळून पडते आणि तिचे ' नाही ते अहंकार बाळगणे ' बंद होते !

संगणकाची पूर्ण हार्ड डिस्क जाळून टाकणारा व्हायरस आला आहे, म्हणतात -- हवा वा पाणी विषारी केले जाऊ शकतात -- अणुयुद्ध तर आपल्याला धाकात ठेवून आहेच ! -- हे सगळे माणसाच्या मनाशी संबंधित आहे, याकडे दुर्लक्षच करायचे, हे सगळ्यांनी ठरवलेच आहे का ? अशा मूलभूत प्रश्नांना ' अध्यात्मिक ' असे लेबल लावून टाळण्याचा, बुद्धिप्रामाण्यवादाचा हा अत्यंत धोक्याचा असा माजोरीपणा आहे का ?

माझी कोणतीही पोस्ट म्हणजे ते माझे म्हणणे असेल, असे नाही. बऱ्याचदा मी अनेक बाजूंनी खुली असणारी वाक्ये देत असतो. निष्कर्षरूप पोस्टस मी सहसा देत नाही. अमुक अमुक असे आहे, तर काय -- असा प्रश्नही त्यात अध्याहृत असतो.

December 10

भारतातले वा जगातले जे जे बघायचे वा अनुभवायचे राहिले ( त्यातले कळले वा जाणवले किती असते, हा भागच वेगळा ) ते ते विचारात घेता, तेवढे आपले जगणे अपुरेच राहिले, म्हणायचे ! आणि हे क्षेत्र ज्यांनी खूपच पादाक्रांत केले, त्यांचे जगणे त्या प्रमाणात समृद्ध झाले, म्हणायचे ! शिवाय, आवड असूनही, वाचनही बरेचसे राहूनच जाते ! खूपच अपुरे जगणे !

December 9

" मैं झाड़ू, आम हुई -- डार्लिंग तेरे लिये ! "

December 8

( ज्यांच्या लक्षात येईल तेवढ्याच फ्रेंडससाठी -- )
आले रे आले ! गोदो आले !

December 7

विनय आपटे ! माझ्या आठवणीप्रमाणे ' मेन विदाऊट शॅडोज ' हे नाटक सादर करून एकदम ताकदीने समोर आलेला दिग्दर्शक, नट ! तो दूरदर्शनवर होता तेव्हा त्याने आर बी आय साठी माझा ' नातं ' हा दीर्घांक बसवला होता -- त्या निमित्ताने आमची भेट झाली होती ! एक अतिशय समझदार, बुद्धिमान कलावंत ! त्याच्या स्मृतीस अभिवादन !

मादक द्रव्यांचा व्यापार, जुगार, वेश्याव्यवसाय आणि करोडोंत चालणारी करमणूक -- यांचा अधोलोकाशी -- गुन्हेगारी जगताशी -- लागाबांधा असणारच ! आपल्याला करमणूक आवडते म्हणून आपण म्हणतो, करमणूक हवीच, पण बाकीचे वाईट !

जितक्या अधिकाधिक लोकांची करमणूक करता येईल तितक्या त्या व्यक्ती अधिकाधिक ग्लॅमरस होत जातात. त्याही व्यक्ती जगणे शिकवतातच -- कष्ट, शिस्त, लक्ष्यावर लक्ष, संकटसमयी धीर बाळगणे, वगैरे. खूप झाले ! बाकी आपल्याला आपापले व्याप भरपूर असतात ! शिवाय त्याही व्यक्ती आपल्यासारख्याच दुःखी असू शकतात, हेही मधून मधून कळते ! -- तरीही त्या व्यक्ती इतक्या पुढे जातात ! -- हाही एक लेसनच की !

December 6

स्त्री-पुरुष समानतेचे जगभर आणि इथेही खूप चालते ! तुम्ही हे वाचले असेल, मी ते वाचले असेल -- ते ठीक ! इतकी वर्षे हे चालू आहे -- नेमके अडथळे काय आहेत, ही समानता अस्तित्वात येण्यात ? विद्वत्ता कुणाकडे असेल तर हवीच आहे, पण आपापल्या आकलनातूनही बोलू या ना !

December 5

विचारवंत व्हायला बुद्धी, मेहनत, वेगळी समज, तर्कज्ञान आणि अभिव्यक्तीची सशक्त कुवत -- एवढे तरी लागणारच ! काहीजण आधीच ' जाऊ दे ! ' म्हणतील ! काहीजणांना, ही आपल्या बसची बात नाही, हे थोड्या विचारांती समजूही शकेल ! पण विचारवंत म्हणून नुसते पोझ करायला, आविर्भाव आणायला काय हरकत आहे ? तेवढेही जमू नये ? त्यासाठी एका गोष्टीचा सराव लागेल असे दिसते -- ती म्हणजे -- आपल्याला जे समजत नाही त्याला दुय्यम, तिय्यम वा फालतू म्हणणे किंवा बेस्ट म्हणजे त्याची टिंगलटवाळी करणे ! आणि शिवाय थोडे उपरोधिक, कुत्सित बोलता येत असेल तर सोन्याहून पिवळे !

December 4

मानणे-बोलणे आणि वर्तन यांत एकात्मता असू शकते, यावरच समजा माझा विश्वास नाही. म्हणजे, संस्कृती, नीती, निष्ठा, यांच्या सगळ्या गप्पा गृहीत धरून मी हे बोलतोय. तशी एकात्मता नसलेले सगळेच समजा ढोंगी, अप्रामाणिक आणि थोडेफार गुन्हेगार आहेत, तर, माझ्या आकलनाप्रमाणे यात माझ्यासह सगळ्याच व्यक्ती येतात -- स्त्रिया आणि पुरुष. प्रमाणाचे फरक असतात आणि उघडकीला येण्याचे. अशा बाबतीत जास्त टिवटिव करणारा जास्त दुभंग असण्याची शक्यता असते !

सेक्सचा शारीरिक तसेच भावनिक-मानसिक अतिरेकही माणसाच्या शरीरातल्या रसायनांचे संतुलन बिघडवून त्याला ' आजारी ' करू शकतो, असे वाचनात आले. स्त्रियांचे दिसणे आणि त्यांचे सुंदर आणि कमीजास्त कापड लागणारे पोषाख हे सतत उद्दीपित करतातच, असे असते तर, विशेषतः मोठ्या शहरांतले बहुसंख्य पुरुष आजारी पडून, खंगून, मृत्युपंथाला लागले असते. तसे घडताना दिसत नाही. त्यामुळे, बलात्कारासारख्या दुर्घटनांसाठी स्त्रियांच्या विशिष्ट कपड्यांना कितपत दोष देता येईल, याची शंका वाटते.

December 1

एकाच विषयावर तीनचार वा अधिक ज्ञानशाखांनी भरपूर आणि सखोल काम केलेले आहे समजा ! म्हणजे ते अभ्यासल्याशिवाय काही कळणार नाही ! बरे, आणखी एखादी नवीनच ज्ञानशाखा निघून एक वेगळाच अभ्यास त्याच विषयावर समोर येईल ! आणि हे चालूच राहणार ! म्हणजे आता नीट कळले, असे कधीच नसणार ! शिवाय यांना या अभ्यासकांचे पटणार, त्यांना त्या ! आणि त्यातही विषय जर असेल -- ' माणसाचे मन ' ! ! ! ! ! " मानववंशशास्त्रापासून करा सुरुवात ! "

November 2013

November 30

' मला सर्व सुखे मिळायलाच हवीत आणि त्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणे योग्यच आहे ' -- हे तत्त्व सर्वांसाठी योग्य आहे -- पण, जगात विषमता, अन्याय, क्रौर्य -- हे नसावे ! -- हे मान्य करताना आपल्याला काय म्हणायचे असते ?
की ' मूल्य ' याचा अर्थ एक आत्मवंचना, असाच असतो ?

November 29

आशयनिष्ठ समीक्षेचे मराठीतले एक अत्युच्च शिखर म्हणून माधव आचवलांचे ' जास्वंद ' हे पुस्तक जरूर वाचावे. ( माझ्या मते ) याला म्हणतात ' दर्जेदार समीक्षा ' ! कलाकृतीच्या अंतरंगात शिरून, तिच्या सखोल अर्थवत्तेत बुडी मारून तिची अकल्पित रहस्यरत्ने आपल्यासमोर आणून ठेवणारे असे समीक्षक विरळा ! अशी समीक्षा ज्या भाषेत असेल तिथे कलेचे भान खूपच सखोल असेल, यात शंकाच नाही ! लेखकांच्यांतलीही सुप्त सर्जनकेंद्रे जागी करण्याचे सामर्थ्य अशा समीक्षेत असते ! अशा वेळी लेखक आणि समीक्षक दोन्हीही तोलामोलाच्या सर्जक व्यक्ती असतात !

" १ दांभिकता नाकारून प्रामाणिकपणे लिहायचं असेल तर ' भूमिका ' घेऊन लेखन करायची आवश्यकता नसते.
२ भूमिकावाल्यांचे गट आपल्यातल्या फुटकळ आणि सुमार साहित्यिकाला मोठं करण्याचा प्रयत्न करत राहतात.
३ असा काही समूहवाद भोवताली असतानाही तुम्हाला तुमचा अथक प्रवास चालूच ठेवायचा असतो.
४ विसंगती अशी आहे की आत्मनिष्ठ लेखकाला दांभिक भूमिकावादी-समूहवादी व्यक्तींपासून स्वतःला दूर ठेवायचे असले तरी सर्वदूर पसरलेल्या सर्वसामान्य माणसांबाबत अम्लान अशी आस्था टिकवायची असते. " -- भारत सासणे, चतुरंग मैफल, लोकसत्ता, आज दि ३०-११-१३.

November 28

उद्या, ३०-११-१३ ला, कोल्हापुरात राज्यनाट्यस्पर्धेत माझे ' ढोलताशे ' हे नाटक सादर होत आहे.
जमेल त्यांनी पाहावे.

रवींद्र लाख्यांच्या दिग्दर्शनाखाली माझ्या ' प्रेमच ...... ' च्या काही प्रयोगांत नायकाचे काम करणारा आमचा छान मित्र ललित प्रभाकर आता ' रेशीमगाठी ' या मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिकेत आला आहे ! अर्थातच आनंद आहे ! मी मालिकांचा न-प्रेक्षक असूनही त्याच्यासाठी दोन भाग बघितले ! ये कुछ तो करेगा जरूर ! माझ्या त्याला शुभेच्छा !

यशस्वी व्हायचेय ? -- जास्तीत जास्त टेन्शन घे !
शय्यासुख हवेय ? --- टेन्शन नको !

लोकांना कामात गाडून टाकावे आणि त्यांना मोकळे क्षण मिळूच नयेत, असा काळ आहे ! तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे माणसाला खूप मोकळा वेळ मिळेल, असे वाचनात आले होते ! तो अंदाज खरा होण्याचे काही चिन्ह नाही !

Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's status update.

दै. ठाणे वैभव
समीक्षा
" ए, आपण चहा घ्यायचा? "
- आनंद देव
मस्त, कडक तीन नंबरी स्पेशल !

संसाराचा जीवन गाडा नीट चालवायचा तर पती आणि पत्नी हि त्याची दोन चाकं व्यवस्थित, लयीत चालली पाहिजेत. त्यांची वेळो वेळी देखभाल करायला हवी, त्यांना तेलपाणी-वंगण द्यावं लागतं. एक चाक जरी कुरकूरू लागलं कि संसाराचं संगीत बेसूर होतं. गाडा नीट चालत नाही. हा प्रश्न सुखी, समाधानी जीवनासाठी सर्वात महत्वाचा आणि मोठा. तो वांगणीच्या भारतवासी प्रबोधन संस्थेने 'ए, आपण चहा घ्यायचा?' या नाटकात मांडला. संस्थेच्या नावातच प्रबोधन हा शब्द आहे, त्यामुळे प्रत्येक विवाहित जोडप्याचं छान प्रबोधन झालं !

रवी - प्रभा आणि विजय - संगीता हि दोन जोडपी. यातील नवऱ्यांना पक्कं कळून चुकलंय कि स्त्री ही खूपच अगम्य अशी गोष्ट आहे. तर त्यांच्या बायकांनाही वाटतं की नवरोबा म्हणजे एक गूढ आहे. हा सार्वत्रिक अनुभव लेखक चंद्रकांत प्रभाकर देशपांडे यांनी या नाटकात सांगितला. दिग्दर्शक अभिजीत जयवंत झुंजारराव यांनीच रवीची भूमिका केली, त्यामुळे त्यांनी हा विषय समजून उमजून नेमका मांडला. आपापले प्रश्न एकमेकांना सांगताना एक हमाल रवीच्या घरात येतो. हमाल हे एक प्रतीक, तो लोकांची ओझी वाहणारा आणि त्यांचा त्रास कमी करणारा असा आहे. तो या दोन जोडप्यांना त्यांचा त्रास कमी होण्यासाठी काही सल्ले देतो आणि एक 'यंत्र' देतो. हे यंत्र म्हणजे एक वितभर लांबीची रिकामी पांढरी चौकट आहे, म्हणजे हे काही यंत्र नसून एक निर्वात पोकळी, त्यावर विश्वास ठेवायचा, असे हे निरर्थक समजावे असे एक रूपक आहे. अखेर दोन्ही जोडपी आपापली चूक स्वत: मान्य करतात, त्या पुन्हा होऊ नयेत याची दक्षता घेण्याचं ठरवतात आणि फर्मास कौटुंबिक तीन नंबरचा कडकमिठा चहा मस्त रंगत आणतो.

रवि प्रेक्षकांशी थेट संवाद साधतो तो चहाबरोबर कुरकुरीत बिस्कीटासारखा आहे. त्यामुळे प्रेक्षक नाट्यकृतीशी सहज जोडले जातात. त्यांचेच मन कुरतडणारे प्रश्न आहेत, त्यामुळे रवि विजय, प्रभा संगीता आणि हमालाच्या संवादांना दाद मिळते. पाचही व्यक्तिरेखांचा अभिनय नैसर्गिक होता. त्यामुळे विषय, सरळ सोपा सदर झाला.

संसारी जीवन सुखाचं, आनंदाच व्हावं याची गुरुकिल्ली यातून मिळते, ती किल्ली जपून ठेवायची आणि तिने नेहमी आपल्या प्रश्नाचं कुलूप उघडायचं असं हे छान हलकं फुलकं पण जीवनस्पर्शी नाटक झालं. दिग्दर्शकाने ते मजे मजेत पण गांभीर्याने वठवलं.

दर्जा: ****

November 27

कोणत्याही माणसाच्या प्रत्येक कृतीला कारणे आणि समर्थने असतात. तरीही, कायदे आणि नीतीनियम यांमुळे त्याला अनेक कृती न करता थोपवाव्या लागतात आणि दबवाव्या लागतात ! त्यामुळे मानसिक विकृती तयार होतात आणि कायदा आणि नीती यांविरुद्ध वर्तन घडते !

November 26

आवडीनिवडी, अग्रक्रम, स्वार्थांचे प्रकार आणि काय श्रेयस्कर याबाबतची मते -- या सगळ्यांत, माणसामाणसांत, खूप वैविध्य असते, हे मान्य करून, माणूस माणसासाठी आदर्श आणि उपयुक्त ठराव्यात अशा अनेक वैचारिक रचना शोधून काढतो / तयार करतो. उदाहरणार्थ ' लोकशाही ' ! पण कोणत्याही रचनेच्या अंमलबजावणीत तिचे हमखास बारा वाजतात ! असे होण्याची कारणे काय, कोणती असावीत ?

November 25

राजकारण इतके गुंतागुंतीचे आणि गुप्त हालचालींचे असते की साध्या नागरिकाला ते काहीच समजू नये. जाहीरनामे, विचारसरण्या अभ्यासून कुणी मते घडवताना दिसत नाही. उपकार, मिंधेपणा, मदत, वाटप -- यांचाही सहभाग असतोच. आणि दहशत ? ती तर लागणारच ! शिवाय जात, धर्म, भाषा -- या अस्मिता कशा सोडणार ? आणि अचानक येणाऱ्या लाटा ! त्याही असतातच ! -- हे सगळे पाहता ' लोकशाही ' चा अर्थ काय समजावा ?

Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's photo.

ए, आपण चहा घ्यायचा? आज दि.२६ नोव्हेंबर २०१३ सायं ७ वा. काशिनाथ घाणेकर मिनी थिएटर, हिरानंदानी मेडोझ, ठाणे- ( प ) आपली उपस्थिती अपेक्षित.

ए, आपण चहा घ्यायचा?
आज दि.२६ नोव्हेंबर २०१३ सायं ७ वा.
काशिनाथ घाणेकर मिनी थिएटर, हिरानंदानी मेडोझ, ठाणे- ( प )
आपली उपस्थिती अपेक्षित.

November 24

काळ बदलला आहे, असे म्हणतात. अनेक प्रेमप्रकरणांची आवड असलेली स्त्री आणि अनेक प्रेमप्रकरणांची आवड असणारा पुरुष यांच्यांत समजून-उमजून प्रेमप्रकरण असू शकते का ? कशा स्वरूपाचे ? हे उघडपणे होऊ शकते की याला लपवाछपवी आणि फसवणूक यांची गरज पडतेच ?

November 21

अ आणि ब. दोघांचेही एकमेकांवर अतोनात प्रेम. पण अ च्या स्वभावात एक खोड अशी की जी ब ला चालणार वा सहन होणार नाही. हळूहळू हा प्रश्न कळत जातो, ठळक होत जातो. प्रेमामुळे, तो प्रश्न घातक ठरू नये म्हणून दोघेही प्रयत्न करतात. शेवटी लक्षात येते की त्या प्रश्नात बदल होणार नाही आणि तो प्रश्न अधिकाधिक जीवघेणा होत जातो आहे. मग मार्गच उरत नाही. दोघेही ते त्यांचे प्रेम मातीत घालून कायमचा निरोप घेतात. ---- याला ट्रॅजेडी म्हणावे की कॉमेडी ? का ?

भावनिक आठवणींत रमणे जितके जास्त तितका वर्तमानाचा मार जास्त !

November 20

" आता तुमच्या डावीकडे पाहा -- हीरोने हिरॉईनला प्रपोज करायची ही बाग आहे -- आता उजवीकडे पाहा -- प्रेम फेल गेले तर दुःखात राहण्यासाठी ही बाग आहे -- आता पुन्हा डावीकडे पाहा -- प्रेम सफल झाले तर आनंदात गाणी म्हणण्यासाठी ही बाग आहे ! -- अनेक हीरो हिरॉईन्स या तिन्ही बागांचा मनसोक्त लाभ घेत आलेले आहेत ! " ( -- रामोजी फिल्म सिटीमधला एक बसराईडवाला गाईड. )

November 16

भाषेत खेळणाऱ्या माझ्यासारख्याला निवृत्तीची गरज नाही. ' बरा वेळ जातो तुमचा, छान लावून घेतलाय तुम्ही छंद ! ' -- हे ऐकून घेणे, हा लेखकासाठी सर्वात मोठा अपमान असतो, तेवढा मात्र सहन करावा लागतो. मुद्दाम कुणी असे करत नाही, त्यांना चांगलेच बोलायचे असते ! बाकीचे म्हणाल तर ' खूपच आवडतेय आम्हाला, लिहीत राहा ' असेही फारसे कुणी कळवत नाही आणि दुर्लक्ष करायला तुलनेने खूपच कमी वेळ लागत असल्याने ' बास आता ! कंटाळा आला ! ' -- असेही कुणी कळवत बसत नाही. त्यामुळे, मनकी मर्जी, दिलका राजा -- असे चालू शकते ! सारांश, निवृत्ती नाही -- पण, बाहेरगावी जात असल्याने, तात्पुरती चार दिवसांची एक छोटीशी रजा घेतोय इथून -- तोवर बाय !

November 15

शंभर शतके !!!!!
इतका परिपूर्ण समारोप ! ग्रेट ! सचिनच्या अलविदा-भाषणाला
एक हजार शतकांचे श्रेय द्यावे !

कोणतेही दुःख हे शहाणपणाच्या शक्यतेचा निर्देश करते, पण दुःख म्हणजे शहाणपण नव्हे किंवा ते अटळपणे शहाणपण देतेच, असेही नाही.

November 14

अचानक आडव्या आलेल्या एका मोटरसायकलवाल्याला वाचवण्यासाठी रिक्षावाल्याने एकदम ब्रेक मारला -- रिक्षा उलटून पडली -- ड्रायव्हरला काही झाले नाही पण आतला प्रवासी खलास झाला ! तो प्रवासी असा होता की ज्याच्या अंत्ययात्रेला काही हजार लोक आले -- कार्स आणि दुचाक्या यांची गर्दी झाली ! -- एकजण म्हणाला की त्या मोटरसायकलवाल्याला वाचवायची काही गरज नव्हती -- त्याला ठोकले असते तरी चालले असते ! --- पण फ्रेंडस, माणूस कसाही असो, त्याची सहजप्रेरणा शक्यतो दुसऱ्याला वाचवण्याचीच असते ! तिचा असा दुष्परिणामही होऊ शकतो ! आणि तो मधे आलेला हीरो कोण होता, तो असा का वागला असेल, कोण जाणे ! खूप गुंतागुंत आहे !

सचिन ( संदर्भ -- २०० वी आणि निवृत्तीपूर्वीची शेवटची टेस्ट )
करोडोंचे प्रेम, लोभ, भावना आणि स्वतःच्या मनातही उद्भवू शकणारे वादळ -- हे सगळे रद्द करून, तो त्याचा खेळ खेळतो -- हे नुसते थक्क करणारे नसून, एक विलक्षण कल्पनातीत शक्यता प्रत्यक्ष दाखवणारे आहे !

मरू दे सगळे, एक तासभर मजेत राहू -- असे मुळात शक्य आहे का आणि असल्यास अशा मजेत राहण्याबद्दल कुणाकुणाच्या काय काय कल्पना आहेत ? उदा. मी -- एकटा, अकर्म राहीन !

एकजण म्हणाला, " मोठमोठ्या कंपन्यांमध्ये, ऑफिसांत, व्यवसायांत -- कामांच्या ताणांपेक्षा माणसांच्या एकमेकांतल्या संबंधांचे ताण फारच अधिक जीवघेणे असतात ! "

November 12

बाकी सगळे बंद झालेले असते -- खाणे तर अत्यावश्यक असते -- तुम्ही रस्त्याकडेला उभे राहून आहे त्या गाडीवरचे मिळेल ते खाता -- ते काही अगदीच गटारखाणे नसते पण आरोग्यविचार धाब्यावर बसवणारे नक्कीच असते ! समजूनउमजून रामभरोसे ! असे आणखी काय काय असते जगताना घडणारे ?

November 11

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा कानडीत अनुवाद, तिथले प्रख्यात नाटककार डॉ. डी. एस. चौगले यांनी केलेला असून पुढल्या महिन्यात त्याचे कानडीत प्रयोग सुरू होतील. त्या नाटकाच्या तालमी सुरू असून, निनासम या

नाट्यसंस्थेतून प्रशिक्षित झालेली राजेश्वरी नामक मुलगी त्याचे दिग्दर्शन करत आहे. वरवरचे वागणे आणि आतले कामभावनांचे प्रवाह, हा या नाटकाचा विषय आहे. आजच त्या दिग्दर्शिकेशी फोनवर बोलणे झाले. एकदोन सूचना दिल्या.

भांडणात, वादात आपण जिंकलो म्हणजे आपले सत्य, असा माझा विचार मुळीच नसतो. आपले आकलन मित्रांशी शेयर करावे, थोडी चर्चा करावी आणि सोडून द्यावे, एवढाच माझा इथे हेतू असतो. आणि मला हेही सुचवायचे असते की सांस्कृतिक क्षेत्रात जिंकण्यापेक्षा आणि आपले न पटणाऱ्यांना नेस्तनाबूत करण्यापेक्षा, सर्व तऱ्हांना असू देण्याचे औदार्य महत्त्वाचे असते. हे ज्यांना दिसत नसेल त्यांचा संस्कृतीशी कवडीचा संबंध नाही, असे मला आकळते !

November 10

क्रोधात आहे, नाराज आहे, काळजीत आहे, आनंदात आहे -- या अर्थांच्या स्मायली वापरून काम भागतेय -- प्रत्यक्षात ते सगळे असायची गरज नाही ! यापुढे, स्मायलीच एकमेकांवर प्रेम करतील आणि त्या स्मायलींच्या मालकांना त्याचा पत्ताही असणार नाही !

November 8

" लेखकाला किंवा लिखाणाला अस्मिता असावी, हे मला पटत नाही.तो प्रकार एकांगी, एकारलेला आणि प्रचारकी ठरतो. लेखक हा फक्त लेखक असावा, तो कुणाचाच नसावा. लेखन हे फक्त लेखन असावं आणि ते सर्वांचं असावं. लेखन हे नेहमी निर्विकार, निर्विष आणि तटस्थ असावं आणि ते सर्वांचंच असावं. कोणत्या तरी एकाच मुद्याचा अभिमान बाळगून त्याचाच फक्त ढिंढोरा पिटावा असं मला वाटत नाही. मला कशाचाच अभिमान वाटत नाही. हे सगळं जग, त्याच्या सर्व काळांसह मला माझं वाटतं, पण त्यातले कृत्रिम भेद मला माझे वाटत नाहीत. "
-- राजन खान ( आपले मित्र ) -- आजचा लोकसत्ता -- चतुरंग पुरवणी.
" भूमिका घ्या " म्हणणारे आणि " भूमिका घेतो " म्हणणारे खूप आहेत मराठीत. थोडे असेही असू द्यात !

ज्या घरात, आपल्याला न पटणाऱ्या व्यक्तींबद्दल तिरस्काराने बोलणे, त्यांची हेटाळणी करणे याचबरोबर आपणच कसे योग्य, चांगले आणि खरे शहाणे -- अशा प्रकारचे बोलणे चालते त्या घरातल्या मुलांवर तेच संस्कार होणार, मग त्यांच्याकडून कितीही शुभंकरोती म्हणून घ्या ! क्षमाशीलतेचा, समजुतदारपणाचा अभाव असलेले वातावरण मुलांना संकुचितता शिकवते -- प्रेम करण्याची त्यांची शक्ती नष्ट करत जाते.

November 7

माधुरी दीक्षितचा फोटो दिसला -- म्हटले, अरे वा, चला, पाठवावी फ्रेंड-रिक्वेस्ट -- तर कसले काय, तिथे फक्त लाईक करायची सुविधा आहे ! आणि तिला तर रोज असे करोडो लाईक येत असतील -- आपण दिसणारही नाही तिला ! क्षुद्रतेत जन्म वाया गेला आपला !

November 6

Champra Deshpande shared Ina de Graaf's status update.

I am so clever that sometimes I don't understand
a single word of what I'm saying .

-- Oscar Wilde.

आजच्या ' लोकसत्ते ' तला श्रीनिवास हेमाडे यांचा आल्बेर काम्यू वरचा लेख जरूर वाचावा. या छोट्याशा लेखानेही, तत्त्वज्ञान हे माणसाच्या जगण्याशी किती अविभाज्यपणे निगडित आहे, हे लक्षात येते.

November 5

जाता-येता, गरज नसेल तेव्हा, मनाचे बटण बंद करा -- एनर्जी वेस्ट करू नका !

भांडणाचे मूळ स्त्रीतच आहे या खात्रीने पुरुषाने विचारपूर्वक त्याची दहा कारणे सांगितलेली असतात -- स्त्री, बऱ्याचदा, त्यांतल्या एकाही मुद्याचे बौद्धिक उत्तर / समर्थन देत नाही -- ती समग्र आकलनाच्या मार्गाने जाऊन प्रश्न नाहीसा करते ! ' मग माझ्या एवढ्या बौद्धिक कष्टांचा उपयोग काय ? ' या प्रश्नाने पुरुष दिङ्मूढ होतो ! अशा वेळी पुरुषाने त्याची बुद्धिमत्ता गुंडाळून ठेवणे बरे !

स्त्रिया महाधूर्त आणि महाबावळट असतात -- दोन्ही ठिकाणी पुरुष हतप्रभ होतो !

स्त्रिया शांत, सरळ, सज्जन, निष्पाप, काही वेळी पटकन विश्वास टाकणाऱ्याही असतात -- पण त्या, प्रसंगी पुरुषाच्या मनाची अशी अवस्था करू शकतात की त्यापेक्षा नरकातले हाल परवडावे -- बरे, पुरुषाचे असे व्हावे, त्याचे असे हाल व्हावे, असा त्यांचा हेतू असतो, असेही नसते, बऱ्याचदा !

" पुन्हा पुन्हा तुझ्यावर विश्वास टाकण्याकडे माझा कल होतो, हा माझा कमकुवतपणा आहे, पण त्याचा गैरवापर करू नकोस -- "

November 3

सर्व वाईट गोष्टींचा अंधकार
नष्ट होवो
असे म्हणता म्हणता
पटकन थांबलो
कारण त्यात
माझाही नंबर लागणार
हे स्पष्ट दिसले !
--
--
--
सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !!!

October 2013
October 31

कशावर तरी चिडून, मी हे चारपाच दिवस वाया घालवायचे ठरवले आहे.
त्यात आणखी उद्यापासून सगळ्यांचा उत्साह आणि आवाजकी दुनियाके दोस्त यांचा जोर असेलच !
नाही तरी बोंबलायला मी काय करणार होतो -- हा प्रश्न बरोबरच आहे.
मला महत्त्वाचे वाटणारे काही केले असते, इतकेच.

पण, मरू दे -- हीच सध्या अवस्था !

October 29

अमुक समाजसमूहांनी माझ्या समूहावर पूर्वी अन्याय केले, तो राग मनात धरून होणारे माझे वागणे पुरोगामी -- पण अमुक धर्माच्या लोकांनी माझ्या धर्माच्या लोकांवर पूर्वी अत्याचार केले, हे लक्षात ठेवून वागणारे प्रतिगामी ! -- यातले तर्कशास्त्र कसे असते ?

October 28

जात, धर्म, वर्ण, देश, भाषा -- असे मानवनिर्मित भेद नसते तर कोणत्याही स्त्री-पुरुष प्रेमात शुद्धता नसती राहिली ? शुद्धता म्हणजे फक्त स्त्री-पुरुष आकर्षण.

हे रस्त्यातले खड्डे बुजवणे, पाणीपुरवठा, स्त्रियांसाठी स्वच्छतागृहे -- असे प्रश्न तर सोडवलेच पाहिजेत -- पण, मला सांस्कृतिक क्षेत्रावरही आपण बोलले पाहिजे, असे वाटते -- समजा मी सत्ताधीश झालो / झाले तर कोणते फतवे ताबडतोब काढले पाहिजेत असे मला वाटते ? -- सगळे पुतळे हटवा, कुठेही व्यक्तींची नावे असता कामा नयेत, नागरिकत्वाच्या नोंदीत जात / धर्म असता कामा नये -- वगैरे -- ज्याला जे सुचेल ते इथे द्यावे -- सगळे इथे एका ठिकाणी जमवू या --

October 27
Champra Deshpande wrote on Vidyadhar Joshi's timeline.

भरपूर हार्दिक शुभेच्छा !

October 25

मराठी माणसाचे दिवाळी अंक वाचन -- याचे एकेक वैशिष्ट्य सांगा.

मी सुरुवात करतो -- वाचत असलेल्या अंकावर चकली वा चिवड्याचे डाग पाडणे.

मानसिक ताणांनी शक्ती वाया जाते, माणसाला होणारे ८० टक्के रोग त्यांतून उद्भवतात आणि आयुष्य कमी होते ( किंवा पटकन संपूही शकते ), हे माहीत असूनही, काहीजण या समस्येला आध्यात्मिक म्हणून फेटाळण्याची जुर्रत का करत असावेत ? ( जुर्रत -- हा शब्द बरोबर आहे ना, तेही सांगा. )

एक तत्त्व आहे -- लेखकाला जे ' वाटते ' ते त्याने सत्य म्हणूनच बोलावे -- आणि याला जोडून दुसरे एक तत्त्व आहे -- काहीही बोललात तरी त्यात थोडे तरी तथ्य असतेच !

October 24

आपले अत्यंत खाजगी, मनात प्रयत्नपूर्वक दडवलेले, प्रश्नही ज्यांना सांगावे आणि त्यांवर ज्यांच्याशी बोलावे, अशा मित्रमैत्रिणी असण्याने वा नसण्याने काय काय घडू शकते ?

October 23

गंभीर आणि हलकेफुलके मुळात एकच !

October 20

Gaurav Raut मोबाईल प्रेयरचा अलार्म तर सेट झालेला नाहीये ना?
22 minutes ago · Like · 1 -- गौरव राऊत हे खरे तज्ज्ञ निघाले ! त्यांच्या कॉमेंटनंतर जरा संशोधन केले, तर त्यांचे बरोबर ठरले ! आता " प्रभू, मला क्षमा कर आणि गौरवना अनेक शुभाशीर्वाद दे " असे म्हणून मी माझे ते एकमेव संतप्त स्टेटस काढून टाकत आहे. आता माझे अज्ञान जाहीर मान्य करून, थोडा वेळ ते स्टेटस इथे राहिल्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करत आहे ! धन्यवाद गौरव !

काल सकाळी पुण्याहून मुंबईला जायचे होते. एका ठिकाणी एकपर्यंत पोचायचे होते. सुमारे सातची एशियाड पकडावी, ती अकरा-साडेअकरापर्यंत पोचेल, मग हॉटेलात जेवण घ्यावे आणि तिकडे जावे, असे ठरवले होते. स्टँडवर गेलो तर एशियाड ऐवजी शिवनेरी मिळाली – म्हटले, चला, जाऊ मस्त एसीत, आरामशीर. शिवनेरी साधी कधी चालतच नाही, ती सारखी चित्त्यासारखी झेपावतच जाते – सव्वा तीन तासांत तिने मला दादरला नेऊन सोडले ! आता इतका वेळ करायचे काय, हा प्रश्न समोर आला. ऊन आणि उकाडाही होतेच – निर्णय घेतला – एखादी बियर मारू शांतपणे आणि मग जेवण करून

जाऊ, म्हणजे ठीक होईल. या विचाराने समोर दिसलेल्या एका बारमध्ये गेलो. तिथे बसल्यावर लक्षात आले – शेजारीच, बॅगपायपर आणि सोडा यांच्याबरोबर एक मध्यमवयीन-अनुभवी माणूस एका नवख्या तरुणाला काही समजावून देत होता. दोघेही परप्रांतातले असावेत. त्या मध्यमवयीनाचे कुटुंब, मुले इथेच होती, त्याने थोडाफार जम बसवलेला होता, हे लक्षात आले – कारण तो तरुण, भाभी कैसी हैं, बच्चे कैसे हैं, वगैरे विचारत होता. म्हणजे या मध्यमवयीनाच्या मार्गदर्शनाखाली काही काम करून पैसे मिळवण्यासाठी तो तरुण इकडे आला होता. मुंबईची बरीच उपयुक्त माहिती असलेले एक पुस्तक एसटी, लोकल्स अशा ठिकाणी विकण्याचे काम प्रथम त्याला देण्यात आले होते. पुस्तक छोटेसेच होते – त्या पुस्तकाच्या प्रतींचा एक गठ्ठा त्याने त्या तरुणाला दिला. तुझी एक चूक होते तो म्हणाला, ती करू नकोस – तू या पुस्तकाची किंमत सांगायला विसरतोस. तसे नाही करायचे, म्हणाला. “ सिर्फ दस रुपया – दस रुपया – दस रुपया “ – अशीच सुरुवात करायची म्हणाला. म्हणजे लोकांचे लक्ष वेधले जाते आणि किंमत कमी असल्याने लोक अधिकच लक्ष देऊन पाहतात, म्हणाला. त्या तरुणालाही दोन मुली आणि दोन मुलगे होते, हे त्याच्या बोलण्यातून समजले. त्याच्या बायकोचा विषय निघाला तर त्याला तिचा प्रचंड विश्वास असल्याचे दिसले. “ मेरी औरत तो मेरे लिये जान तक दे देगी ! “ – असे तो म्हणाला. म्हणजे बायकोमुलांना पोसण्याच्या उद्योगात हा इकडे इतक्या लांब राहणार आणि ती वेळ पडल्यास जान देणारी ! एक विचार आला – हा काही महिने इकडे एकटा राहणार, इच्छा होणारच नाही ? इथे कुठे एखाद्या रोगाचा प्रसाद देणाऱ्या बाईकडे हा गेला तर ? – आणि तिकडे अनेक महिने हा नसणार – तिच्याशी कुणी एखादा आपुलकीने, प्रेमाने वागणारा तिला भेटला तर, तिचीही ती गरजच नसेल का ? किती काय गृहीत धरणार माणसे ? पण असे बरेच गृहीत धरल्याशिवाय जगता तरी येईल का ? लाखो लोकांची कुटुंबे एकीकडे असतात आणि ते भलतीकडेच असतात ! म्हटले तर प्रचंड अनिश्चितता, असुरक्षितता आहे – पण त्यावर मात तर करावीच लागणार – विश्वास, ये एक बहुत बडी चीज होती है ! मरद और औरत, दोनोंके लिये !

October 17

भावनिक बडेजाव माजवणाऱ्या मराठीत, वैचारिक अंगानेही कला ' असू ' शकते हे अंमलात आणणाऱ्या प्रत्येकाचे महत्त्व आहे, मग त्याचा आशय तुम्हाला पटो वा न पटो -- या कारणासाठी गोपू महत्त्वाचे ! नंतरच्या, या प्रकारच्या लेखकांना अशांमुळे भूमी मिळू शकते !

October 16

भाषा, संवाद आणि संपर्क -- या विषयावर गोपूंनी एक नाटक लिहिलेले आहे -- ते म्हणजे

' म्यूझिक सिस्टम ' -- ( ' सिस्टिम ' म्हटलेले त्यांना चालत नसे आणि हे नाटक विजय केंकरेने बसवले होते म्हणजे त्याला ते माहीतच होते -- तरीही मटामधल्या आज आलेल्या त्याच्या प्रतिक्रियेत त्याने ' सिस्टिम ' च म्हटले आहे ! ) -- ते नाटक डावी विचारसरणीबिरणी काही सांगत नव्हते -- सरळ मानवी प्रश्नावर होते -- त्यामुळे मला ते आवडले होते -- गोपूंनी असे नाटक लिहिले याचा एक जास्तीचा आनंदही त्यात होता ! विशेष म्हणजे, त्यांच्या चाहत्यांसह अनेकांना ते नाटक आवडले नाही. काही लोक मधूनच निघून जात. जे पूर्ण पाहात ते, नाटक संपताच तुरंत बाहेर पळून जात ! पुण्यातला त्या नाटकाचा प्रयोग पाहिल्यावर मी माझे मत सांगायला आत गेलो होतो -- तिथे गोपू होते -- गोपूंचे अभिनंदन करणारा मी एकटा होतो ! ते त्या वेळी मला ओळखत होते की नाही, कोण जाणे, किंवा मी सांगितलेही असेल. हा कोण वेडा, एकटाच कसा काय माझे अभिनंदन करतोय, असेही त्यांच्या मनात येऊन गेले असेल ! ऐसा भी होता है !

गोपू -- एक प्रेमळ व्यक्ती !
-- त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

एका साधूच्य दिव्यदृष्टीप्रमाणे भारतात बक्सर इथे भूगर्भात एक हजार टन गुप्त सोनेसाठा आहे ! अनेक यंत्रणा शोधासाठी सज्ज झालेल्या आहेत ! ( झी टीव्ही ). येत्या १८ ला काळजीपूर्वक खोदाई सुरू होत आहे ! समजा हे खरे ठरले तर भारत-अमेरिका संबंधांत काय बदल होतील ? किंवा भारतातली महागाई कमी होईल का ? -- असू द्या हो -- चर्चा करायला काय हरकत आहे ? ! हवे तर, '१४ च्या निवडणुकांवर काय होतील याचे परिणाम -- हा घ्या विषय !

October 15

--- या कलाकृती का आवडल्या आणि त्या का नाही अशा एकमेकांच्या मतभेदांवर गेली कित्येक वर्षे वाद घालत आलात, भांडलातही बऱ्याचदा -- काय साध्य झाले ?
-- सांस्कृतिक वाढ होत राहते, दुसऱ्यांचे मुद्दे आपल्याला कळतात, आपले दुसऱ्यांना कळतात --
-- सांस्कृतिक वाढ ?
--- भाषा सुधारते, विचार सुधारतात, प्रतिके-प्रतिमा कळतात, माणसाचे मन कसे चालते ते कळते -- कलाकृतीमुळे -- त्यावरच तर भांडणे होतात --
-- आणि अमुक सन्मान वा पारितोषिक याला मिळणे बरोबर की चूक की त्याला मिळायला हवे होते -- या चर्चेतून काय साध्य होते ?
-- राजकारण कळते, आपण जे सांस्कृतिक क्षेत्र म्हणतो ( ते नोबेलचे नाही माहीत, आपले बोलतोय ) तेही किती असांस्कृतिक असते ते कळते -- आपले व्यक्तिमत्व समृद्ध होते --

-- अच्छा ! चालू द्या मग !

October 12

गजब कहाणी

जोसे सारामागो ( कुणी जूझे सारामागू म्हणतात. ) यांच्या ‘ द एलेफंटस जर्नी ‘ या कादंबरीच्या, आपले इथले एफबी-मित्र ( आणि माझे जुने मित्र – मोहितने दिग्दर्शन केलेल्या माझ्या ‘ नाणेफेक ‘ या पीडीए निर्मित नाटकापासून ) प्रदीप वैद्य यांनी केलेल्या ‘ गजब कहाणी ‘ या नाट्यरूपांतराचा प्रयोग काल पाहिला. केवळ अप्रतिम ! नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, रंगभूषा, वेषभूषा, दिग्दर्शन, अभिनय – हे सगळे एकजीव होऊन जमून आल्यावर काय घडू शकते याचा हा जिवंत अनुभव ! मोहित टाकळकरचे अत्युत्तम दिग्दर्शन हा अर्थातच या प्रयोगाचा पाया ! एका राजाच्या राणीने बेडवर शय्याक्रीडेत असताना राजापुढे एक इच्छा व्यक्त करणे – इथून या नाटकाचा आणि यातल्या हत्तीचा प्रवास सुरू होतो. तुम्ही नुसती एक कथा म्हणून पाहाल तर कदाचित कंटाळाल, पण थोडी स्वतःची कल्पनाशक्ती जागी ठेवून पाहाल तर हे एक अर्थस्फोटक नाटक आहे. त्या एका इच्छेतून किती लोक कामाला लागताहेत, त्यांच्यांत कायकाय घडते आहे, किती प्रदेशांतून, वातावरणांतून, माणसांच्या प्रकारांतून तो हत्ती आणि बरोबरचा सगळा लवाजमा जातो आहे – हे सगळे अचंबित करणारे आहे ! आणि तो हत्ती ! ही एक वेगळीच अजब कहाणी आहे ! गीतांजली कुलकर्णी ! ( या अभिनेत्रीने माझ्या ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नाटकात एक भूमिका केली होती, त्यामुळे मला तिचा जरा जास्तच अभिमान ! ) ही जर नुसती अशीच तुमच्यापुढे आली आणि ही हत्तीचा रोल करणार आहे असे तुम्हाला सांगितले तर तुम्ही हसत सुटाल – पण निव्वळ अभिनयातून अगडबंब हत्ती कसा उभा करता येतो, हे या जातिवंत, गुणवान अभिनेत्रीने दाखवून दिले ! यात गाणी आणि नृत्येही आहेत ! आणि ( बहुतेक ) जपानी भाषेतले काही संवाद ! ‘ परिपूर्ण नाटक ‘ असे क्वचित बघायला मिळते – मी या नाटकाला त्या विभागात घेईन – परिपूर्ण नाटक !

October 11

' ललित ' ऑक्टो'१३ नाटक विशेषांक मधला अरुण घाडीगावकरांचा लेख वाचा. मराठी व्यावसायिक नाटकाचे अवघडच दिसतेय चित्र ! ( हे लेखक माझे जुने मित्र -- विनायक पडवळ आणि यांनी मिळून माझे ' दिनकर पुरोहितचा खून ' हे नाटक ' पोत्यातून गोत्यात ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवर आणले होते. प्रकाश बुद्धिसागर या विनोदसम्राट दिग्दर्शकाचे हे व्यावसायिकवरचे पदार्पणाचे नाटक. तगडे कलाकार होते -- माधव वाटवे, आत्माराम भेंडे, आशा भेंडे, उदय म्हैसकर, दीपा श्रीराम ! खूप मजा यायची ! )

October 10

बुद्धिप्रामाण्यवादी हा आशावादी असू शकतो का ?
निराशावादी हा परिवर्तनवादी असू शकतो का ? आणि पर्यायाने --
बुद्धिप्रामाण्यवादी हा परिवर्तनवादी असू शकतो का ?

आज जरा डोक्याला खुराक असे काही स्टेटस देणार आहे -- त्यांतले पहिले --
पृष्ठस्पर्शी आणि सखोल यांतला साहित्याच्या / कलेच्या संदर्भातला फरक काय ?
बुद्धिप्रामाण्यवाद्याला सखोल काही कळू शकते का ?

चोरीचा आळ न येता चोरी करण्याची हमखास यशस्वी रीत ः --
कोणताही इंग्लिश पिक्चर सुरुवातीपासून पाहावा -- त्यात काय घडते आहे आणि त्यातली पात्रे काय बोलताहेत याची सतत कल्पना करत जावे -- जमेल तेवढे भराभर लिहूनच ठेवावे -- हळूहळू कल्पनेची भर घालत स्टोरीही पूर्ण लक्षात घ्यावी -- सिनेमा संपताना त्यातली पात्रे आनंदी होती की दुःखी हे पाहून, आपण आधी लिहिलेल्या स्टोरीत योग्य ते बदल करावे. बास ! याच मटेरियलची कथा, दीर्घकथा वा कादंबरी लिहावी ! चोरीचा आळ तर येणारच नाही, पण विलक्षण प्रतिभेचे कौतुक होईल ! ( सदर स्टेटस हे, इंग्लिश सिनेमा, त्यातले संवाद आणि त्यात एकूण काय चालले आहे -- हे मुळीच न कळण्याच्या भक्कम पायावर आधारलेले आहे ! )

October 9

आपल्यासारख्यांना फेसबुकवर फ्रेंडस असतात पण काही स्पेशल लोकांना फक्त अनुयायी ( म्हणजे फॉलोवर्स ) असतात !
ही काही वेगळी सोय आहे का फेसबुकवर ?

हिंदी चित्रपट क्षेत्रात चित्रपटांची नुसती नावेही रजिस्टर करता येतात, असे ऐकून आहे. ' कभी खुशी कभी गम ' या चित्रपटाच्या नावावरून भांडण झाले होते, असे स्मरते ( की दुसरा कोणता चित्रपट ? तज्ज्ञांनी सांगावे. ) त्या कायदेशीर भांडणात जी तडजोड रक्कम लागत असेल ती इथल्या शंभर उत्तम कवींना आयुष्यात कवितेवर मिळणाऱ्या एकूण रक्कमेच्या काही पटींत असणार ! शहाणे-सकाळ प्रकरणामुळे सगळ्यांनी घाबरून जावे, असे वाटत नाही. आता यापुढे सगळे सारखे

कोर्टाकडे धाव घेतील, अशी मुळीच शक्यता वाटत नाही. पैसा, प्रसिद्धी, मान हे सगळेच आपल्या कवितेच्या क्षेत्रात नगण्य आहेत. डोंट वरी !

October 7

ते लोकसत्तेतले स्वामित्वहक्क प्रकरण पाहिले -- बाकी मतमतांतरे, वाद ठीक -- पण त्या छापलेल्या कवितेचा मोबदला त्या कवितेच्या हक्कधारकाला द्यावा, असे काही कोर्टाने म्हटलेले दिसत नाही -- म्हणजे मराठी कवितेला शून्य किंमत असते, हे कोर्टाला ठाऊक असेल काय ?

October 6

आपल्याला एखाद्या व्यक्तीबद्दल खूप आपुलकी, जवळीक आहे असे आपल्याला वाटत असते, आपण तसे व्यक्तही करत असतो -- तरीही ती व्यक्ती आपल्याकडून वारंवार अपमानित होते, दुखावली जाते -- असे कशामुळे घडत असेल ?

आमचे काकडेकाका
श्री. अरुण काकडे यांची 94 व्या अखिल भारतीय नाट्य संमेलन अध्यक्ष पदी निवड !!!
रंगायन आणि आविष्कार या संस्थांचे आधारस्तंभ आणि छबिलदास चळवळही जोमात चालण्यात मोठा सहभाग असलेले, असे हे आमचे काकडेकाका नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होणे ही अत्यंत आनंदाची घटना आहे ! आम्ही प्रायोगिक रंगभूमीच्या क्षेत्रात आपापले काम करणारे लोक हे जाणून असतो की काकांचे काम हे मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या बाबतीत भक्कम पाया निर्माण करणारे काम आहे. काकांना स्नेहपूर्ण सलाम, अभिनंदन आणि शुभेच्छा !

October 5

आपण आपापल्या स्वभावाप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे निर्णय घेत जातोच -- दुसरे काय करणार ? प्रत्येक निर्णयाचे परिणाम अनुकूल / प्रतिकूल कसेही होऊ शकतील. ज्याची खात्री कुणीच देऊ शकत नाही, त्याचे ताण कशाला ? काही ना काही घडेल -- आणि हेच जगणे असेल, तर अमुकच घडावे, हा निरर्थक अट्टहास काय कामाचा ?

October 4

सहकारी हौसिंग सोसायट्या वा अपार्टमेंटस इथे -- पदे हवीत पण समजून कामे करणे नको आहे, असे किंवा दुसरे काही हेतू असलेले लोक, बऱ्याच ठिकाणी पदाधिकारी असतात. वेळ नाही हे कारण सांगणारेच बहुसंख्य असतात. याला खूप प्रचंड वेळ द्यावा लागतो, असेही नसते. या सहकारी तत्त्वाचे फायदे हवेत पण त्यासाठी काम मुळीच नको आहे -- असे चित्र दिसते. रोटेशनने प्रत्येक मेंबरला कामाची सक्ती करणे, हा उपाय योग्य होईल का ? दुसरे कोणते उपाय सुचतात ?

October 3

आत्ताच दूरदर्शनवर ' दूरदर्शनच्या संग्रहातून ' हा कार्यक्रम पाहिला. लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर आणि आमचे सर प्रा. शंकर वैद्य होते. आमचे सर ज्ञानेश्वरांच्या रचनांचे अर्थ उलगडून सांगत होते आणि हृदयनाथांच्या संगीतासह लता दीदी गात होत्या ! सुंदर कार्यक्रम ! आज, असलीच तर, जी काय थोडी साहित्याची समज मला असेल, त्यात आमच्या या सरांची खूप मोठी देन आहे. कॉलेजचे सगळे तास संपल्यावर, सर, माझ्यासह दोन विद्यार्थी आणि दोन विद्यार्थिनी असे आम्ही तास-दीडतास बसून मर्ढेकरांचे ' सौंदर्य आणि साहित्य ', चर्चा करत, समजून घेत असू. त्यांच्या पत्नी कै. प्रा. सरोजिनी वैद्य यांच्यामुळे प्रथम मी आकाशवाणीच्या स्टुडियोत गेलो आणि माझ्या कविता वाचल्या ! माझ्या कविता, एकांकिका वाचून, खूप आवडल्याचे सांगणारे, हे मला भेटलेले पहिले जाणकार ! आपण जे आपले म्हणतो त्यात आपले फार कमी असते -- असे कुठून ना कुठून मिळालेलेच जास्त असते !

October 2

सात्त्विक संतापासारखे आणखी कोणकोणते संताप असतात ? की प्रत्येकाचा प्रत्येक संताप सात्त्विकच असतो ? तसे असेल तर नुसतेच ' संताप ' का म्हणू नये ?

September 2013

September 28

कलावंताची निष्ठा त्याच्या सर्जकतेवर असण्याचा एखाद्या व्यावहारिक प्रक्रियेवरही कसा प्रभाव पडतो -- त्याची इंटरेस्टिंग हकीगत वाचा ' अनाघ्रात ' या लेखात. आपले मित्र आणि महाराष्ट्राचे ख्यातनाम चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांचा हा लेख ' ललित ' च्या सप्टेंबर २०१३ च्या दृश्यकला विशेषांकात आलेला आहे.

September 27

लवचिक भूमिका चांगली की कट्टर भूमिका चांगली -- यावर भूमिका घेत बोलायचे !

September 25

ज्यावर काही मतभेद होणार नाहीत, ज्या वाक्याचे विरूपीकरण वा उदात्तीकरण होणार नाही आणि ज्यावर शांत, सहज ' लाईक ' करून पुढे जाता येईल -- असे निरुपद्रवी स्टेटस कधी ना कधी मला सुचेल का, असा प्रश्न पडतो ! सुचावे, असे वाटतेही !

September 24
Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's photo.

अभिनय, कल्याण निर्मित ए, आपण चहा घ्यायचा? शनिवार दि.२८ सप्टें. २०१३ सायं. ६.३० सहयोग मंदिर, घंटाळी, ठाणे - प
अभिनय, कल्याण निर्मित
ए, आपण चहा घ्यायचा?
शनिवार दि.२८ सप्टें. २०१३
सायं. ६.३० सहयोग मंदिर, घंटाळी, ठाणे - प

September 21

निवडणूक व्यक्तिकेंद्रित करायची रणनीती आखण्यामागे, बाकीचे पक्षीय स्तरावरचे मुद्दे गौण व्हावेत, हा हेतू असू शकतो. सध्या तरी विरोधक या रणनीतीला बळी पडताहेत, असे दिसते !

Champra Deshpande shared Shirish Deshpande's photo.

Here is the completed painting. It is an oil on canvas size 24x30 inches (61x76 cms)..... This is from a series of 10 paintings ... "A walk through Old Delhi Streets".. .... I hope you like it...

September 20

या एकट्या माणसामुळे भारत देश जगतोय, असे इथल्या सव्वाशे कोटी लोकांपैकी किती जणांना वाटत असेल ? ' मलाच सगळे कळते ' या भ्रमात असलेला माणूस ! याच्या मताप्रमाणे सगळे भारतीय वागले नाहीत तर हा देश सोडून जाणार, असे म्हणतोय -- हे पाहता, याचा इथल्या लोकशाही पद्धतीवर विश्वास नाही, या कारणाने, याचा असलेला मताधिकारही काढून घ्यावा.

September 17

एक जुना मित्र भेटला -- भेटीचा आनंद वगैरे झाल्यावर, मधेच तो असे बोलून गेला --
" कामासाठी, उपजीविकेसाठी मन लागतेच -- पण ते सोडून, बाकी म्हणशील, तर मन म्हणजे सततचा जाच आणि जगण्याला काच आहे ! " ज्यांना साधी माणसे म्हटले जाते तीही जगणे समजून घ्यायच्या प्रयत्नात असतातच !

September 16

( यावर बऱ्यापैकी गडबडण्याची शक्यता दिसते, म्हणून विचारतोय -- )
' प्रियकर ' आणि ' प्रेयसी ' या शब्दांना इंग्लिशमधले करेक्ट प्रतिशब्द सांगा.

September 15

' मोठ्या ' -- विशेषतः सिनेमातल्या -- लोकांच्या भानगडी आणि लागेबांधे नावांनिशी चघळले जातात -- साध्या, सामान्य माणसांच्या तशाच गोष्टी, अधिक सनसनाटी असल्या तरी, त्या बिचाऱ्यांकडे कुणी फारसे लक्ष देत नाही ! हा एक प्रकारचा अन्याय नाही वाटत ?

September 13

' मला सगळे कळते ' असा उग्र भाव चेहऱ्यावर असणे इथल्या लोकांना फारसे आवडत नाही. नम्रपणामुळे असेल किंवा आपल्याला सगळे कळते -- असे शक्यच नसते -- या जाणिवेमुळे असेल किंवा खरोखरच काहीच कळत नसल्यामुळेही असेल -- काँग्रेसवाल्यांच्या चेहऱ्यांवर असा भाव नसतो -- त्यामुळे इथे निवडून येण्याची शक्यता नेहमीच त्यांना जास्त असते ! यशाचे हे रहस्य पुरोगामी आणि प्रतिगामी दोघांनाही कळलेले नाही !

अत्यंत ठासून बोलणारे आणि टिपेच्या आवाजात मत व्यक्त करणारे स्टेटस असेल तर, थोडे जरी वेगळे काही म्हणायचे असेल तर, फ्रेंडस बिचकण्याची शक्यता असते.

September 12

मनाचे काहीच परिपूर्ण असू शकत नाही कारण परिपूर्ण मन असे काही नसतेच. त्यामुळे निष्ठाही परिपूर्ण असू शकत नाही. हे समजून, तरीही, एकमेकांचे अपमान न करता सन्मानाने जगता येऊ शकते का आणि कसे -- हा प्रश्न विचारात घेतला पाहिजे.

September 11

मित्रवर्य रवींद्र लाखे यांनी दिलेले जेकेंचे उदधृत मला फारच महत्त्वाचे वाटते, म्हणून इथे पुन्हा देत आहे ---
It is no measure of health to be well adjusted to a profoundly sick society. J.K.

September 10

आपल्याला न आवडणाऱ्या, न पटणाऱ्या गोष्टींतही काहीतरी चांगले असतेच की ! आता हा गणेशोत्सवच घ्या -- याच्या मागचे, पुढचे असे मिळून एकूण पंधरा दिवस मी अतिशय आनंदात असतो -- विशेषतः सकाळी ! कारण ? अहो, वर्तमानपत्रे पाच मिनिटांत वाचून संपतात !

मी टीव्ही बघत बसलो होतो. फारसा नाही बघत -- जेवायची वेळ झाली होती आणि वाढणे चालू होते, तोवर काही बघावे म्हणून आपला बंधू जेम्स बाँड याचा पिक्चर बघत होतो. तेवढ्यात वाढून झाले म्हणून जेवायला गेलो. तर माझी आठ वर्षांची नात तिथे आली. नाही तरी टीव्हीचे मला कौतुक नसते, हे तिला माहीत असल्याने तिने चॅनेल बदलले आणि डोरेमान चालू

केला. मी दोन मिनिटे जाऊ दिली. मग तिला म्हणालो, " मला बघायचाय हं टीव्ही १०-१५ मिनिटं -- " ती " हो -- " म्हणाली. इथपर्यंत हे ठीकच झाले. दोन मिनिटांनी तिने तिच्या चित्रकलेच्या कामाला जायचे ठरवले. हेही ठीक. पुढे मात्र धक्कादायक घटना ! तिने चॅनेल बदलले, माझा जेम्सबाँडभाऊ असलेले आधीचे चॅनेल चालू केले आणि ती आत गेली. तिला कळलेसुद्धा नाही की आपण एक धक्कादायक चांगली गोष्ट करून गेलोय ! जाताना पुन्हा माझे चॅनेल चालू करून जाणे ! एवढा चांगुलपणा एकमेकांबद्दल दाखवायची गरज नसते, हे बहुमताने अनुभवाला येणारे मी कधीच मान्य केलेले होते. मला तिने वीस वर्षे मागे ढकलले ! पुन्हा मला वाटायला लागलेय की, च्यायला, असे छोटे छोटे चांगुलपणाचे प्रकार अजूनही शक्य असणार, बहुतेक !

September 8

घाण वाढवणे, डीजेचा गोंगाट आणि आरत्यांचा दंगा करून पेशंटस व विद्यार्थी यांना नुसता त्रास देणेच नव्हे तर तोंड दाबून बुक्क्याचा मार देणे, रस्त्यांत सगळीकडे ट्रॅफिक जॅम करून प्रचंड मनुष्यबळ वाया घालवणे आणि एक सार्वत्रिक चिडचिड निर्माण करणे -- अशा गोष्टींना जे लोक देवाची भक्ती समजतात ते निश्चितच खोटे बोलत असतात. कारण अर्थातच त्यांचे काही वेगळे स्वार्थ असतात. देव चांगल्याचे चांगले आणि वाईटाचे वाईट फळ देतो, हे या लोकांना मान्य असते. देव अशी देवघेव करत असेल तर, या वेडपट लोकांच्या हे लक्षात येत नाही, की इतक्या प्रकारे छळ-यंत्रणा उभी करण्याचे कोणते फळ, आज ना उद्या, त्यांना मिळणार आहे !

प्रत्येक व्यक्तीचे स्टेटस त्या त्या व्यक्तीला अर्थपूर्ण वाटतेच -- तो प्रश्न नाही -- पण काही स्टेटस असे असतात की माझ्यासारख्या एखाद्या अतिशहाण्याला वाटते की आधी यातले मुद्दे नीट मांडून घ्यायला हवेत आणि मग कॉमेंट द्यायला हवी !म्हणजे स्टेटस भी मेरा, कॉमेंट भी मेरी ! अशा ठिकाणी मी काहीच न बोलता पुढे जातो. हा मात्र अति नव्हे, साधा शहाणपणा असतो !

September 4

अत्यानंदाची बातमी -- २०१२-१३ साठीचा मुंबई विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट संशोधनासाठी दिला जाणारा अ. का.प्रियोळकर पुरस्कार आपल्या इथल्या फ्रेंड प्रा. प्रतिभा टेंबे यांना जाहीर झाला आहे. जबरदस्त अभ्यासू असूनही सर्वांत छान मिळूनमिसळून राहणाऱ्या या आपल्या अभिमानास्पद मैत्रीणीचे मनःपूर्वक अभिनंदन आणि तिच्या यापुढील कारकीर्दीला हार्दिक शुभेच्छा !

September 3

काही वेळी आपण आपला आणि समोरच्या व्यक्तीचा वेळ अनुत्पादक आणि निरर्थक गोष्टींसाठी वाया घालवत असतो -- त्या वेळी ते आपल्या आणि कदाचित समोरच्या व्यक्तीच्याही लक्षात येत नसते -- पण असे जर लक्षात आले तर नम्रपणे आपण बदल करावेत -- आणि आपल्या ऐवजी समोरच्या व्यक्तीच्या ते लक्षात आल्याने त्या व्यक्तीने योग्य बदल केले तर आपण तो अपमानही मानू नये ! एवढेही करण्यात आपण कमी पडलो तर आपापला वेळ कसा घालवावा याचे स्वातंत्र्य आपण सगळेच घालवून बसू !

September 2

दाभो'ल'कर की दाभो'ळ'कर ? मराठी वृत्तपत्रेही दाभोलकर म्हणताहेत आणि विशेष म्हणजे ' साधने ' च्या अंकातही दाभोलकरच आहे -- म्हणजे ' ळ ' चुकीचा असावा --

September 1

आपल्या फ्रेंड कवयित्री / लेखिका प्रज्ञा दया पवार यांना सुशीलकुमार शिंदे पुरस्कार जाहीर झाला आहे -- त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

August 2013
August 30
Champra Deshpande shared Mandala Homes's photo.

"Anyone who keeps the ability to see beauty never grows old." ~Franz Kafka (photo by the immortal eye of Dany Poirer)

August 29

एक म्हणतो, परधर्मीयांची संख्या वाढतेय त्यामुळे हिंदूंना धोका आहे, एक म्हणतोय हे सगळे भांडवलदार असून चोर आहेत त्यामुळे गरिबांना धोका आहे, एक म्हणतोय भ्रमण आणि निवास स्वातंत्र्याच्या नावाखाली परप्रांतीय वाढत आणि माजत

चाललेयत त्यामुळे मराठी लोकांना धोका आहे -- मी एक साधा सामान्य नागरीक -- मला तिन्ही पटतेय आणि मी भीतीने थरथरतोय -- तर मी कुणाच्या बाजूने जाऊ ? सगळ्यांत मोठा धोका कोणता, हे कसे ओळखावे ?

August 28

संभवामि युगे युगे -- ही या विश्वातली सर्वांत मोठी थाप म्हणावी काय ?

August 25

कलेच्या आवडीपेक्षा शहाणपणाची आवड महत्त्वाची. शहाणपण म्हणजे मी केंद्र नसलेले भान. श्रेष्ठ कलाकृती शहाणपणयुक्त असतात. अशा एका कलाकृतीचा संपर्कही शहाणपणाचे भान देऊ शकतो. त्यासाठी हजारो कलाकृतींच्या संपर्कात येऊन विद्वत्ता वाढवायची गरज नसते. अशा एखाददुसऱ्या कलाकृतीच्या संपर्कात आलेल्याने कुठेही न्यूनगंड बाळगायची मुळीच गरज नसते.

August 23

समजा जन्मापूर्वीच जनुकनकाशा ऍडजस्ट करून चांगलीच ( म्हणजे काय, यावर प्रचंड वाद होतील ) माणसे जन्माला यायची सुधारणा करता आली तर सगळे समतावादी, न्यायी, त्यागी, निस्पृह आणि निःस्वार्थी लोक जन्माला येऊ शकतील का ? आता तेवढीच एक आशा दिसते !

August 22

माणूस समाजवादी विचारसरणी मानणारा असला की तो आपोआप विवेकशील असतोच का ? म्हणजे विवेक हा इतर कोणत्याही विचारसरणीत असू शकत नाही, असे काही ? काँग्रेसच्या माणसामध्ये, कम्युनिस्टात, हिंदुत्ववाद्यात विवेक असू शकतो की नाही ? विवेक म्हणजे अहिंसक मार्गाने जमेल तितकीच कृती करणे, की आणखी काही ? डॉक्टर, वकील, बिल्डर, पोलीस यांचा विवेकाशी असतो का संबंध ? कसा ?

August 21

आपण परमोच्च आशावादी ! माणसाची बुद्धी या जगाची नीट व्यवस्था लावेलच ! ( बुद्धी म्हणा, नाही तर अधिक आवडीने ' विवेक ' म्हणा ! )

August 20

मी लिहिलेले ' ढोलताशे ' हे नाटक ' आविष्कार ' ने रंगमंचावर आणले. दिग्दर्शक विजय केंकरे आणि प्रमुख भूमिकेत अजित भुरे. या सर्वांमुळे हे नाटक डॉ. दाभोळकरांना माहीत झाले असणार. पुण्यात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अधिवेशन होते तेव्हा त्यांनी या नाटकाचा एक प्रयोग त्या सर्व कार्यकर्त्यांसाठी घेतला होता. आणि विशेष म्हणजे त्याच नाटकाला श्री. जयंत साळगावकरांनीही, विशेषतः ' कालनिर्णय ' या दिवाळी अंकाच्या माध्यमातून, बरीच मदत केली होती. ते दोघेही एकाच दिवशी जावेत हा त्या नाटकाच्या बाबतीत घडलेला विचित्र योगायोग ! त्या नाटकातर्फे त्या दोघांच्याही स्मृतीस अभिवअदन !

Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's photo.

अभिनय, कल्याण निर्मित ए, आपण चहा घ्यायचा? लेखक: चं. प्र. देशपांडे आदित्य प्रतिष्ठान, अभिनय कट्टा, ठाणे रविवार दि. २५ ऑगस्ट २०१३ सायं. ६.३० वा. प्रवेश विनामूल्य.
अभिनय, कल्याण निर्मित
ए, आपण चहा घ्यायचा?
लेखक: चं. प्र. देशपांडे
आदित्य प्रतिष्ठान,
अभिनय कट्टा, ठाणे
रविवार दि. २५ ऑगस्ट २०१३
सायं. ६.३० वा. प्रवेश विनामूल्य.

August 19

' साधना ' साप्ताहिकाने आयोजित केलेल्या नाशिकच्या नाट्यसंमेलनाला डॉ. दाभोळकरांबरोबर एका गाडीतून माझे जाणेयेणे घडले होते. अत्यंत आदरणीय व्यक्ती ! त्यांची हत्या होणे हे अति-धोक्याचे असे दुश्चिन्ह आहे. विचार पटले नाहीत की हत्या करायची -- हे तत्त्व अगदी सूक्ष्मपणाने का होई ना, ज्यांना ज्यांना पटते, ते सगळे या हत्येला जबाबदार आहेत.

August 18

एखाद्याने अमुक एक काम आज करणार असे सांगितले, तर ते झाले की नाही की अजून चार दिवसांनी होणार आहे, हे कळवायची गरज नाही -- अमुक वाजेपर्यंत मी काही कळवेन असे म्हटले तरी ते कळवायची गरज नाही -- अगदी जवळच्या नात्यातही, समोरची व्यक्ती एखाद्या निरोपाबाबत उत्सुक आहे, हे माहीत असले तरीही, आपण आपल्याला महत्त्वाच्या, अर्जंट वाटणाऱ्या गोष्टीत रमून जावे आणि बाकी फिकीर करू नये -- हे सगळे हल्ली नॉर्मल समजले जाते ! असल्या नॉर्मल लोकांना बेजबाबदार, अविश्वासार्ह आणि मूर्खपणाने आत्मकेंद्री, असे का म्हणू नये ?

August 16

काही विषय वा मजकूर असा असतो की आपण तिथून लगेच दृष्टी हटवून पुढे जातो -- हे वाचून करायचेय काय किंवा उपयोग काय -- असे विचार या बाबतीत असू शकतात -- किंवा वाचले तरी समजणार आहे का, लक्षात राहणार आहे का -- हेही विचार असतील. उदाहरणार्थ मला घोटाळ्यांच्या बाबतीत तसे होते. प्रत्येकाची ही वगळण्याची क्षेत्रे वेगवेगळी असू शकतील. त्यांची कारणेयुक्त यादी नुसती इंटरेस्टिंगच नाही तर अर्थपूर्ण होऊ शकते. आपण करून पाहू या हा प्रयोग.

August 15

भाषणाच्या शेवटी ' जय हिंद ' म्हणायचे का टाळले असेल ? की ' वंदे मातरम ' आणि ' जय हिंद ' या दोन्हींतले एकच काही म्हटले पाहिजे, असा नियम आहे ?

August 13

एकीइतक्याच इतर अनेक अशा इथल्या आपल्या मैत्रिणी अप्रतिम सौंदर्यवान आहेत ! शब्दांनी बोलण्यात काही अर्थच नाही, त्यापेक्षा ते सौंदर्य पाहून स्तिमित व्हावे आणि त्याचा आनंद घ्यावा, हेच बरे ! हे सगळे निसर्गाचे चमत्कार आहेत ! त्या कधी कधी इथे त्यांचे फोटो देतात तेव्हा स्तिमित होण्याचाच आनंद घेणे याला महत्त्व द्यायचे मी ठरवले आहे ! मला येत असलेली भाषा थिटी आहे, हे कळल्यावर पुन्हा त्याच मार्गाने जाण्यात काय अर्थ आहे ?

राजकारणी -- वेडे -- सारखा डावपेचांचा विचार; दुकानदार -- वेडे -- सारखा मालविक्रीनफा यांचा विचार; उच्चपदस्थ -- वेडे -- सारखा उद्दिष्टांचा विचार; लेखक -- वेडे -- सारखा पारितोषिकांचा विचार; नटनट्या -- सर्व वेडे -- सारखा ग्लॅमरचा विचार; सामान्य नागरिक -- वेडे -- सारखा दुसऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा विचार; आणि उरलेलेही सगळे -- वेडेच -- बदला घेण्याचे विचार वा मत्सराचे विचार. की हेच सगळे शहाणे ? की ' शहाणपण ' हा शब्दच निरर्थक आहे ?

एका इंग्लिश सिनेमातले मला कळले असे वाटलेले संवाद ः --
" त्यांचं सैन्य अभेद्य आणि अजिंक्य आहे -- आपली सगळी ताकद -- सगळं सैन्य इथं लावावं लागेल -- "
" पण एकाच ठिकाणी सगळं सैन्य लावणं धोक्याचं आहे -- इथं संपलं तर सगळंच संपेल -- "
--- आपल्या जगण्यातही येतातच की असे प्रश्न ! कसेही वागले तरी धोक्याचेच असलेले !

August 11

बखर एका राजाची -- ले० त्र्यं वि सरदेशमुख.
ही कादंबरी मी आत्ता वाचली, खूप उशिरा. मराठीतले एक महत्त्वाचे म्हणावे असे काम ! एक प्रकारची फँटसीच. तो माहोल नीट उभा करणारी. त्यातला संस्थानिक राजा आणि राजस नामक एक तरुण स्त्री यांच्यात प्रेमसंबंध तयार होतात पण ते सहजपणे जगण्यात येऊ शकत नाहीत – हा एक त्यातला विषय आहे. तो तर संस्थानिक राजा आणि या राजसला कोणतेही पाश नाहीत – तरीही ते एकत्र येऊ शकत नाहीत. याचे कारण सध्याची राणी दमयंती – तिचे राग, संताप, मत्सर, कारस्थाने आणि अर्थातच नीतीच्या प्रस्थापित कल्पना – ही सगळी आहेत, हे जाणवते. समजा हीच एक घेतली समस्या – तर ही स्त्री-मुक्तीची समस्या म्हणावी की पुरुष-मुक्तीची ? कारण विवाहानंतर दुसऱ्या ठिकाणी प्रेम निर्माण होणे – विशेषतः आजच्या जगात – सहज शक्य आहे. याला न्यायाचे, योग्य आणि तिन्ही संबंधित व्यक्तींना समाधानकारक असे उत्तर असू शकते का ? आणि असू शकत नसेल तर ही समस्या सुटूच शकत नाही – जगण्यातले काही प्रश्न कोणत्याही तथाकथित मानवतावादी विचारानेही सोडवता येऊ शकत नाहीत, असे म्हणावे का ?

August 9

असे एक वाचनात आले की जाहिरातदारांनी मीडियामधून एक प्रचारच सुरू केलाय -- " तुम्हाला काहीही वाचायची, विचार करायची गरजच नाही -- समोर दिसतेय ते पाहा फक्त ! "

August 7

कोणत्या तरी क्षेत्रात काही महत्त्वाचे काम करून यशस्वी, प्रसिद्ध, पैसेवाला/ली होणे म्हणजे चांगले जगणे ? यापैकी काहीच न करू शकलेले म्हणजे कमी दर्जाचे वा वाईट जगलेले, असे म्हणावे का ?

August 6

ज्याला देव तारी
त्याला दारू भारी प्यारी
अन निर्धोक गटारी !

( बाकीच्यांनी सावध असावे, ही नम्र विनंती ! )

August 4

" निर्भय बनो " असे कै. माजी पंतप्रधान मोरारजी म्हणाले होते, ते कुठल्यातरी संज्ञाप्रवाहाने आठवले. सल्ला तेव्हाही आकर्षकच होता, आजही आहे ! समजा आज कुणी हा सल्ला दिला तर या देशाच्या नागरिकाने नेमके काय करावे, म्हणजे त्याला या सल्ल्याप्रमाणे निर्भय बनता येईल ?

आता मैत्री डे साजराबिजरा करून झालाय, आता बोलू ! एकीला म्हणतात निखळ मैत्री आणि याच्या विरुद्ध ती -- स्वार्थाधारित मैत्री ! खरेच असतात, असे दोन प्रकार ? आता निखळ किंवा निःस्वार्थ मैत्री का महत्त्वाची ? तर सुखदुःखे ( विश्वासानेही ) शेयर करणे, प्रसंगी निरपेक्ष मदत करणे -- यासाठीच ना ? मग हे निःस्वार्थ का म्हणावे ? कुठल्याही मैत्रीत सुखतत्त्व असणारच ! त्याला बाध आला तर प्रॉब्लेम होणारच ! मग कसला डे साजरा करतो आपण ?

August 3

मराठी समीक्षेत व्यक्तिगत जाणीव आणि सामाजिक जाणीव असे जे वर्गीकरण केले जाते ते मला मुळीच मान्य नाही.
-- वसंत आबाजी डहाके.
( आज दि. ०३ ऑगस्टचा लोकसत्ता ).

आज पुण्यात लख्ख ऊन, दोनतीन चुकार पांढरे ढग, बाष्पहीन कोरडा, सुखद वारा आणि कोरडे रस्ते ! ' पावसाळा ' या चालू नाटकाचे हे मध्यांतर असावे ! आपोआप, सहज सादर होणारे नाटक !

August 2

Champra Deshpande shared Bhaskar K Naidu's photo.

I URGE ALL MY FRIENDS TO READ & SHARE THIS; YOU COULD SAVE A LOVED ONES LIFE BY KNOWING THIS SIMPLE INFORMATION!!! Stroke has a new indicator! They say if you forward this to ten people, you stand a chance of saving one life. Will you send this along? Blood Clots/Stroke - They Now Have a Fourth Indicator, the Tongue: During a BBQ, a woman stumbled and took a little fall - she assured everyone that she was fine (they offered to call paramedics) ...she said she had just tripped over a brick because of her new shoes. They got her cleaned up and got her a new plate of food. While she appeared a bit shaken up, Jane went about enjoying herself the rest of the evening. Jane's husband called later telling everyone that his wife had been taken to the hospital - (at 6:00 PM Jane passed away.) She had suffered a stroke at the BBQ. Had they known how to identify the signs of a stroke, perhaps Jane would be with us today. Some don't die. They end up in a helpless, hopeless condition instead. It only takes a minute to read this. A neurologist says that if he can get to a stroke victim within 3 hours he can totally reverse the effects of a stroke...totally. He said the trick was getting a stroke recognized, diagnosed, and then getting the patient medically cared for within 3 hours, which is tough. >>RECOGNIZING A STROKE<< Thank God for the sense to remember the '3' steps, STR. Read and Learn! Sometimes symptoms of a stroke are difficult to identify. Unfortunately, the lack of awareness spells disaster. The stroke victim may suffer severe brain damage when people nearby fail to recognize the symptoms of a stroke. Now doctors say a bystander can recognize a stroke by asking three simple questions: S *Ask the individual to SMILE. T *Ask the person to TALK and SPEAK A SIMPLE SENTENCE (Coherently) (i.e. Chicken Soup) R *Ask him or her to

RAISE BOTH ARMS. If he or she has trouble with ANY ONE of these tasks, call emergency number immediately and describe the symptoms to the dispatcher. New Sign of a Stroke -------- Stick out Your Tongue NOTE: Another 'sign' of a stroke is this: Ask the person to 'stick' out his tongue. If the tongue is 'crooked', if it goes to one side or the other that is also an indication of a stroke. A cardiologist says if everyone who gets this e-mail sends it to 10 people; you can bet that at least one life will be saved. I have done my part. Will you?

August 1

आजचा दिवस आपण फुकट घालवला, असे कधी समजावे ?

July 2013

July 31

आपल्या मनातले बरेचसे अपराधी भाव हे समाजमान्यता नसलेल्या कृती केल्याचे असतात. एक दिवस ठरवून सगळ्यांनी अशा आपापल्या कृती जाहीर करायचे ठरले तर कुणी कुणाला लाथा घालायच्या असा प्रश्न येईल ! त्यापेक्षा हीच पद्धत बरी आहे -- तशा कृती लपवून ठेवण्यात अपयशी ठरलेल्यांना उरलेल्यांनी लाथा घालणे !

July 30

जे तीव्रपणे हवे असते तेही स्वतःच्या मूर्खपणामुळे नष्ट होऊ शकते ! पण ते तसे नष्ट होताना मूर्खपणा हाच शहाणपणा वाटत असतो !

July 27

The people to whom nothing has happened cannot understand the insignificance of events. -- T. S. Eliot. ( हे बहुतेक ' मर्डर इन द कॅथिड्रल ' या नाटकातले वाक्य आहे -- आठवले तसे दिले आहे. )

July 26

सर्वसामान्यपणे लोक ज्याला चांगले म्हणतात असे वागत गेल्यास तीच तशीच प्रतिमा तयार होते आणि पुढे, ती प्रतिमा भंग पावण्याच्या भीतीने, लोक ज्याला सर्वसामान्यपणे वाईट म्हणतात असे वागताच येत नाही !

सतीश तांबे यांची दिवाळी अंकात आलेली एक कादंबरी आणि त्यांचा एक कथासंग्रह एवढे त्यांच्या लेखनाचे माझे वाचन आहे. आपल्या इथल्या फ्रेंडसमध्ये त्यांचे याहून अधिक वाचन केलेलेही असणारच. कसदार लेखनाच्या बाबतीत मराठीतले हे एक स्वतंत्र शिखर आहे. विचार असा, की मागे एकदा इथल्या फ्रेंडसबरोबर माझा संवाद घडवून आणला गेला होता. त्याचप्रमाणे आपण सतीश तांबे यांच्याशी प्रश्नोत्तर-संवाद साधावा, असे वाटते. त्यासाठी मी काही बीजप्रश्न ( बीजभाषणाप्रमाणे ) काढू इच्छितो. यावर बोला.

July 25

माझी एक मैत्रीण उत्तम गायिका आहे. तिची कधी भेट वगैरे झालेली नव्हती – अशीच थोडी लिखापढी होती. काही महिन्यांपूर्वी आमच्या घरापासून चालत दहा मिनिटांवर तिच्या गायनाचा कार्यक्रम होता पण दुसऱ्या काही व्यस्ततेमुळे मला जाता आले नाही. पण माझी पत्नी त्या कार्यक्रमाला गेली होती. ही एक उत्तम गायिका असल्याने, तू हा कर्यक्रम चुकवू नकोस, असे मी तिला सांगितले होते. ऐकून आल्यावर ती त्या गायिकेबद्दल छान बोलली होती. आज पुणे आकाशवाणीवर ‘ स्नेहबंध ‘ या महिलांच्या कार्यक्रमात त्या गायिकेची मुलाखत होती. माझी पत्नी तो कार्यक्रम नेहमी ऐकते. आज त्या गायिकेचे नाव ऐकल्यावर मला तिने ते सांगितले आणि मला ती मुलाखत ऐकायची आहे का, असे विचारले. म्हटले, नक्कीच ! प्रश्नच नाही ! माझ्या त्या गायिका मैत्रिणीची मुलाखत ऐकून धन्य झालो ! काल आपण जिला एक छोटी मुलगी, उभरती गायिका म्हणत होतो, ती हे असे प्रचंड काम करतेय, हे समजून तिचा अभिमान वाटला. कोण असेल ती ? अहो, आपली साधी, सुंदर, बुद्धिमान, ग्रेट मैत्रीण -- प्राची दुबळे !

July 23

एका खेड्यात मी बँकेचा शाखाप्रबंधक होतो, तेव्हाची गोष्ट. साठ वर्षांच्या वरच्या माणसांना बँक कर्ज देत नसे. एकदा एक, पाहूनच कळेल की हा किमान सत्तरीचा असावा, असा माणूस आला. त्याला तो नियम माहीत होता. त्याने वय कमी सांगितले. मी काही विरोध केला नाही. त्याच्याशी बोलत राहिलो. घरी कोणकोण असते, मुले किती, ती किती शिकली, काय करतात, वगैरे. आणि मग त्याला सांगितले की या सगळ्याचा अर्थ असा होतोय की तुम्हाला पहिला मुलगा झाला तेव्हा

तुम्ही नऊ वर्षांचे होतात ! तो उठून निघून गेला ! तात्पर्य -- एखादे खोटे पचवण्यासाठी शेकडो खोट्यांचे खात्रीशीर जाळे विणता आले पाहिजे. श्रीमंत लोक ही कामे वकील, सीए अशा लोकांकडून करून घेऊ शकतात. गरिबांना वाली नाही हेच खरे !

July 21

हवासा आणि नकोसा असे दोन्ही भाग असलेल्या एखाद्या गोष्टीबाबतचा निर्णय घेणे, आपण कितीही लांबणीवर टाकत नेले, तरी कधी ना कधी तो घ्यावा लागतोच. एक तर नकोश्याबरोबर हवासा भागही सोडावा लागतो किंवा हव्याश्याबरोबर नकोसा भागही स्वीकारावा लागतो. अशा वेळी कशाला महत्त्व देऊन निर्णय होणे योग्य ?

July 20

आपल्याला वाटते की आपल्या बाबतीत जे घडते तेवढ्याशीच फक्त आपण संबंधित असतो ! आणि क्वचित कधीतरी लक्षात येते की तसे नाहीय -- जगात जे जे घडतेय त्या सर्व गोष्टींशी आपण संबंधित आहोत -- कसे ते आपल्याला माहीत नसले तरी !

July 19

As of today, July 19, 2013, at 3:27 pm I DO NOT give Facebook or any entities associated with Facebook permission to use my pictures, information, or posts. By this statement, I give notice to Facebook to cease and desist any attempts and is forbidden to disclose, copy, distribute, or take any other action against me based on this profile and/or its contents. The content of this profile is private and confidential information. The violation of privacy can be punished by law (UCC 1-308 - 1 1 308-103 and the Rome Statute).

July 18
Champra Deshpande shared a link.

Readers of literary fiction are more creative and exercise better judgment, claim scientists
dailymail.co.uk

July 17

आपले मित्र मिलिंद शिंत्रे यांच्या जागतिक भाषिक विक्रमाची आजच्या पुणे लोकसत्तामध्ये जंगी बातमी ! मराठीचे नाव दुमदुमले ! जरूर वाचा ! एखाद्या तज्ञाने लिंकही द्यावी !

सुचरिताचा ' हृदयार्त ' हा कवितासंग्रह वाचतो आहे, त्यातली मला आवडलेली एक कविता ः--

प्रश्न तू नसण्याचा नसतो
नको ती असण्याचा असतो
एकांत परवडला पण
गर्दी असह्य होण्याचा असतो

प्रश्न दुराव्याचा नसतो
का ? कसे ? कधी ? कुठे ... असा असतो.
प्रश्न प्रश्नांचा नसतो
न मिळणाऱ्या उत्तरांचा असतो.
July 15

भाग मतदार भाग --

मोदी चांगलाय, मोदी वाईटाय, राहुल असाय, राहुल तसाय, हा सगळा निवडणूक स्टंट असतो हो, पण त्याने काम केलेय, काय झ्याटाचे काम केलेय, तो प्रामाणिक आहे, तो एक नंबरचा च्यूत्या आहे, सगळे हलकट आहेत, फक्त पृथीराजच खरा, तसे काही नसते हो -- वगैरे .....

July 13

अमुक एक टिकावे आणि तमुक एक लौकर संपावे -- हे चालू असताना, जगणे मजेचे होऊ शकते का ? -- की हे चालू असणे, हीच मजा ?

July 11

सुंदर / आकर्षक / उत्तेजक / मादक.

July 10

" शांतता ही फक्त स्त्रिया आणि कमकुवत लोक यांच्यासाठी असते. "
( ' ट्रॉय ' हा सिनेमा टीव्हीवर फ्क्त पाचच मिनिटे पाहिला, त्यात दिसलेले वाक्य. )

July 9

काल गणेशचे ' मेघदूत ' पाहिले. उत्तम भरजरी पोषाख, रंगोबेरंगी प्रकाशयोजना, १५ नर्तकी, १५ नर्तक, गाणी, पार्श्वसंगीत, नृत्ये आणि काव्य ! मराठीत हा एक वेगळा प्रकार आहे ! एक दीर्घ विरहगीत ! मेहनतीने बसवलेला नेत्रसुखद प्रयोग ! आज पुण्यातल्या सर्व वृत्तपत्रांनी या प्रयोगाचे आवर्जून फोटोंसह स्वागत केलेले आहे. गणेश आणि टीमचे मनःपूर्वक अभिनंदन !

July 8

' रस-अनौरस ' सारखी भारी कादंबरी लिहिणाऱ्या राजन खान यांचीच ' एक लेखक खर्च झाला ' ही कादंबरी वाचली. राजन खान हे सिद्धहस्त लेखक आहेत यात वादच नाही. एका मराठी लेखकाच्या कौटुंबिक जीवनावर फोकस असलेली, असंख्य बारकाव्यांनी भरलेली ही कादंबरी कुणा ऐरागैऱ्याला लिहिता आलीच नसती. मुळात मुद्रितशोधक असलेला एक माणूस लेखक होतो आणि हळूहळू ' मोठा ' लेखक होतो आणि शेवटी त्याचा करुण अंत कसा होतो, याची ही कथा आहे. मुख्यतः त्या लेखकाचे कौटुंबिक जीवन चितारणारी. यात दोन प्रश्न अस्पर्शित राहिले आहेत. एक -- या लेखकाचे त्याच्या लेखनातले अनुभवविश्व कोणते होते आणि दोन तो जर मोठा लेखक झाला तर त्याच्या चिंतनाचे स्वरूप काय होते आणि समीक्षक त्याच्याबद्दल काय म्हणत होते. त्याचे चितारलेले जीवन पाहता, हे कोणत्याही एखाद्या कारकुनाचे वा मुनीमजीचे जीवन असू शकेल, असे वाटते. त्या लेखकाच्या मनाच्या कोनातूनही इथे लिहिले जाते तर त्या लेखकाच्या लेखनाचे स्वरूप का

झाकून ठेवले जाते ? त्या लेखकाची चिंतनशीलता -- जी काय असेल ती -- दिसली असती तर ही कादंबरी खूपच उंचीवर गेली असती. सध्या मात्र, हा ' मोठा ' लेखक झाला असे कादंबरीत सांगितले की आपण मान डोलवायची, असे होते. त्यामुळे, एका सिद्धहस्त लेखकाची फसलेली कादंबरी, असे इथे थोडक्यात म्हणावे लागते.

July 6

त्यात इंटरेस्ट नसलेल्या लोकांना त्याचा त्रास मुकाटपणे सहन करायला लागल्याशिवाय आम्हाला आमच्या धर्मपालनाचे समाधान मिळत नाही !

July 4

आपला मित्र गणेश दिघे याच्या ' मेघदूत ' या भव्य बॅलेची पुणे मटामध्ये मोठी बातमी आलेली आहे. जरूर पाहा. मराठी रंगभूमीवर हे काहीतरी वेगळे, अर्थपूर्ण आणि भव्य असे घडत आहे. गणेशला या महाप्रचंड कामासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

वर्तमानपत्रातले खालील प्रकार समजा वगळले --
समजत नाही आणि आता समजून घ्यायची इच्छाही नाही ( उदा रुपयाची किंमत कशी ठरते वा उसाचे / पेट्रोलचे भाव कसे ठरतात ), पहिल्यापासून फॉलो न केल्याने आता वाचून उपयोग नाही ( उदा एखादी मर्डर केस ), आपला फारसा संबंध नसलेला मजकूर ( उदा फॅशन, माहीत नसलेले खेळ, शास्त्रीय संशोधन ), चित्रकला वा संगीतावरचे लेख, यात नवीन काय असणार असा मजकूर ( उदा दुष्काळाच्या वा पालखीच्या बातम्या ) आणि भ्रष्टाचार कुठे कुणी कसा किती केला याच्या बातम्या व लेख -- तर असे सगळे वगळले तर वाचनीय किती उरते ? आणि हीच पद्धत आपल्या जगण्याला लावली तर ? जगण्यासारखे नेमके काय किती आहे आणि हे ठरवायचे कसे ?

Today, July 4, 2013, in response to the new guidelines of Facebook and under articles L.111, 112 and 113 of the code of intellectual property, I declare that my rights are attached to all my personal data, drawings, paintings, photos, texts etc... published on my profile. For commercial use of the foregoing, my written consent is required at all times. People reading this text can copy it and paste it on their Facebook wall. This will allow them to place them under the protection of copyright.

By this release, I tell Facebook that it is strictly forbidden to disclose, copy, distribute, broadcast, or to take any other action against me on the basis of this profile and/or its contents. The actions mentioned above apply equally to employees, students, agents and/or other staff under the direction of Facebook. The contents of my profile includes private information. The violation of my privacy is punished by the law (UCC 1 1-308 - 308 1 - 103 and the Rome Statute).

Facebook is now an open capital entity. All members are invited to post a notice of this kind, or if you prefer, you can copy and paste this version. If you have not published this statement at least once, you will tacitly allow the use of elements such as your photos as well as the information contained in your profile updates.

July 3

अदृश्य तुरुंग खूप असतात -- आपण तुरुंगात आहोत, हेही माहीत नसते ! पण कधीतरी ते लक्षात येते -- तोवर भिंती, कोणत्याही सिमेंटच्या भिंतींहून, पक्क्या झालेल्या असतात !

July 1

हवीशी गोष्ट, कोणत्याही कारणाने, टाकून देताना / सोडून देताना ती कृती पूर्णतेने होऊ शकते ? कधी ? जेव्हा तसे नसेल होत तेव्हा काय घडते ?

June 2013

June 28

दि २७-०६-१३ ला रात्री ०९-३० वा बालगंधर्व, पुणे इथे ‘ नांदी ‘ या नाटकाचा प्रयोग पाहिला. हृषिकेश जोशी यांनी लिहिलेले हे नाटक काही वर्षांपूर्वी त्यांनीच वाचून दाखवले होते. त्या वाचनाला आनंद इंगळे, अश्विनी गिरी आणि मी हजर होतो. वाचनानंतर आम्ही काही साधकबाधक चर्चाही केली होती. या नाटकात ‘ स्त्री-पुरुष संबंध ‘ या विषयावरची एकूण काही निवडक मराठी नाटकांमधली प्रत्येकी एक अशी दृश्ये घेऊन लेखकाने त्याची काही मांडणी केलेली होती. त्यांत मी

लिहिलेल्या ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नाटकातलेही एक दृश्य होते. नंतर त्या जोश्यांच्या नाटकाचे काय झाले, ते समजले नव्हते. तर त्याच नाटकाचा म्हणजेच या ‘ नांदी ‘ चा पहिला प्रयोग काही दिवसांपूर्वी मुंबईत झाला, त्याच्या आदल्या दिवशी मला जोश्यांचा निमंत्रणाचा फोन आला होता. तेवढ्यासाठी मुंबईला येण्या ऐवजी मी पुण्यात प्रयोग होईल तेव्हा पाहीन, असे सांगितले होते. कालचा हा पुण्यातला तिसरा प्रयोग होता. मला साधा फोनही आला नाही. मी जाऊन माझे मी तिकीट काढून नाटक पाहिले आणि कुणालाही न भेटता परत आलो. कारण मनात राग होता. पण विचारांती मला हे कळले, की समजा ‘ पाऊस ‘ या विषयावर एखाद्याने ललित लेख लिहिला आणि त्यात बऱ्याच कवितांची अवतरणे असली तर त्यांतल्या प्रत्येक कवीला आदरपूर्वक कळवायची काय गरज आहे ? इथेही तसेच घडत होते, हे लक्षात आल्यावर माझा राग गेला. एकूण ‘ नांदी ‘ मला फारसे आवडले नाही. माझ्या नाटकातल्या दृश्याबद्दल बोलायचे तर, माझे मूळ नाटक लक्षात घेता, हे दृश्य चुकीच्या पद्धतीने सादर झाले. पण आहे असे ते प्रेक्षकांना बरेच आवडते, असे दिसले. पण तो चुकीचा राग मनात असल्याने, आत जाऊन माझी ही मते सांगणे झाले नाही, हे बरेच झाले ! कदाचित मराठीतले इतके मल्टिस्टारकास्ट असे हे पहिलेच नाटक असावे. प्रयोग हाऊसफुल होता !

मतभेद असणे, हे जिवंतपणाचे लक्षण आहे -- या घोषवाक्याचा ' लोकशाही ' वर काय परिणाम होतो ? उदा. हा भांडखोर लोकांचा फॉर्म होतो ?

June 27

आपला राग चुकीचा होता, हे नंतर कळणे आणि त्यामुळे आपल्या एकूणच प्रतिक्रिया म्हणजे निव्वळ एक वेडेपणा तर नसेल ? -- असे वाटणे !

June 26

एक घडले -- खूप दुःख झाले, रडू आले; दोन घडले -- प्रचंड संताप आला; तीन घडले -- हृदयात सहानुभूती दाटून आली; चार घडले -- नाजुक प्रेमाचे फूल उमलले; पाच घडले -- सूड घ्यावा असे वाटले .......... असे फेसबुक स्टेटस आयते मिळत राहतात !

" तू साफ चुकीचं बोलतोयस -- तो भ्रष्टाचार २०११ चा नाही तर २०१० चा होता आणि सत्तर हजार कोटींचा नाही तर पंचाण्णव हजार कोटींचा होता -- लावतोस पैज ? "

" लावतो -- चल -- बोल, कितीची ? "

" पन्नासची ! लागली ! "

June 25

संबंधितांची नावे बदलून तेच तेच गौप्यस्फोट बातम्यांत, माहितीत, गप्पांत येत राहतात ! तरीही सनसनाटीपणा वाटून टाईमपास होत राहतो !

June 23

आपली मते आणि आपली मुले यांतून निवड करायची वेळ येईल तेव्हा जर आपण आपल्या मुलांची निवड करणारे असलो तरच मुलांचा आणि आपला संवाद शक्य आहे.

June 22

माणसाला मरणाचे भय म्हणजे काय असते ? -- सवयीचे जग सोडण्याचे भय ? -- पण हे जग सोडल्यावर माझा कुठे प्रश्न येतो ? -- काही राहिलेली कामे अर्धवट राहणे म्हणजे कचरा होणे, संपत्ती काही असेल तर तिची विल्हेवाट ( जी खरे तर मृत्युपत्राने आधीच करून ठेवता येते ), आपल्या माणसांना आपण गेल्याने दुःख होईल, काही अडचणी येतील, याचे वाईट वाटणे -- ठीक -- आणखी काय ?

June 21

चांगली, सर्जक, मौल्यवान, महत्त्वाची, श्रेष्ठ, दर्जेदार, कसदार -- कशीही म्हणा -- तर अशी कला फक्त करमणुकीसाठी नसते, असे म्हटले जाते. मग आणखी काय असते ? काय घडते ? रोजच्या जगण्यातल्या प्रश्नांचा आणि अशा कलेचा काय संबंध असतो ?

June 20

मानापमानामुळे हिंसक होणारा वेडा की मानापमानच न होणारा वेडा ?

June 19

आपले मित्र श्री. मुरली खैरनार यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानची अभ्यासवृत्ती मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंद !

June 18

' पिपीलिका ' म्हणजे लाल मुंगी -- पण ' पिपीलिका मार्ग ' म्हणजे काय ? कोणाला माहीत असल्यास सांगावे.

June 17

मानसिक निष्ठाबिष्ठा गेली ढगात, कारण ती तपासणे शक्यच नाही -- वर्तमान क्षण महत्त्वाचा -- या पद्धतीने स्त्री-पुरुषांचे आयुष्य सुखाचे होइल ! -- ( की नाहीच ? )

June 15

सनसनाटीपणा वाटत नाही, आकर्षण वाटत नाही, अपराधी भाव नाहीत -- असे मन असू शकेल ?

June 14

जसे अमुक एका माहोलामुळे निव्वळ -- उदा. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, राजकीय, महायुद्धे, झोपडपट्टी वा श्रीमंती महालांचा माहोल -- साहित्य मौल्यवान ठरत नाही, तसेच ते अमुक एका वादामुळेही निव्वळ मौल्यवान ठरत नाही. मग ते कशामुळे मौल्यवान ठरत असावे ? की मौल्यवान वगैरे असे काही नसतेच ?

June 13

अहो, उत्तर-आधुनिकतावाद समजून घेण्यासाठी आम्ही तयार होतोय तोवर तो वाद मेलाही ? बोंबला ! आता काय आलेय ? ... या भोसडीच्यांना कळायच्या आत तीन स्टेप्स पुढचे आपणच काढू या आता काही तरी !

June 5

तरुणीने आपल्या बॉयफ्रेंडच्या मित्राला आकर्षिण्याचा प्रयत्न करू नये, तिने तसे केल्यास त्या तिसऱ्याने तिच्याकडे दुर्लक्ष करावे -- तसेच -- कोणत्याही तरुणाने आपल्या मित्राच्या प्रेयसीवर लाईन मारू नये -- एवढी नैतिकता तर सर्वमान्य दिसते ! -- कोणतीच चौकट नको, असा काळ अजून आलेला दिसत नाही !

June 4

एकूण मानवजातीतले बहुमत ग्राह्य झाले तर कुणाही क्ष चा सुखदुःखसाठा नगण्य होईल ! आणि सगळ्यांचेच असे होईल ! मजा येईल ! ( शारीरिक वेदनांपासून औषधांनी मुक्ती मिळाली की झाले ! )

June 2

प्रत्येकाचे परिणामस्वरूप व्यक्तिमत्व, शरीर, मेंदूतल्या पेशी आणि रसायने वेगवेगळीच असणार. कुणाचेच सगळ्यांना पटणार नाही. प्रत्येकाच्या टिंगल-टवाळ्या होणार, सगळेच कुणाला ना कुणाला हसणार, कुत्सित बोलणार, एकमेकांना नेस्तनाबूत करण्याचे राजकारण करणार. बरे, मग ?

May 31

आज पहाटे तीनपासून एक कावळा ओरडत होता -- ओरडण्यात गॅप कमी, सातत्य होते -- मला वाटले तो आजारी असून त्याला वेदना होत असाव्यात -- सुमारे तासाभराने तो ओरडायचा थांबला -- मला वाटले त्याला थकून ग्लानी आली असावी -- त्याला सदिच्छा देण्यापलीकडे मी काहीच करू शकत नव्हतो ! -- हे सगळे अंदाजे वाटण्याला तरी शास्त्राधार कितपत आहे, कोण जाणे !

May 2013

May 31

समजा १०० पैकी गुण आहेत -- आज, हवेसे घडणे याला ५० गुण पडलेत आणि हवेसे न घडणे यालाही अर्थातच ५० च गुण आहेत -- तर दिवस चांगला गेला की वाईट ?

May 28

तुझीमाझी ओळख आहे
हे कुठे सांगत नाही
अकारण नको बभ्राही
नको काहीबाही

किती शोधले, किती शोधले
नाहीच सापडलीस
शोध थांबवून विसावलो तर
क्षणात मनात उमललीस

मॉलमधून येतायेता
ट्रॅफिकमध्ये दिसलीस
गर्दीच्या मी खाल्ल्या शिव्या,
तू तर सस्मित भेटलीस !

तू आहेसनाहीस तुलाही नाही माहीत
गप्प होऊन आलो मी तुझ्याकडे
अशक्य – असे जेव्हा
ते म्हणाले घाईत

May 27

बस्स, एक महिना तर आहे -- संपेल !

May 25

बाहेर अनेक सेन्सॉर आहेत, पण कलावंताच्या मनातल्या भीतीचा सेन्सॉर -- त्याचे काय ?

' तेच तेच ' चा कंटाळा येऊन आपण जे करतो / जगतो तेही त्या ' तेच तेच ' मध्येच का जमा होते ? आणि नसेल जेव्हा तसे होत तेव्हा वेगळे काय घडते ?

May 17

मी काही म्हणालो, ते म्हणाले बाता आहेत
मनाच्या ठिकऱ्याच फक्त खऱ्या त्रात्या आहेत

May 16

नाही नाही म्हणत म्हणत झाला वाटले वादा
आधी मला नष्ट करून झालीस आता फिदा !

May 15

मागण्याने तुझ्याकडून
तू काहीच नाही देणार
नाकारण्याने तुला
तू नाही जाणार ...

माझे एकटे असणे

तुझ्या सोबतीशिवाय

नसतेच --

May 13

I would rather trust a woman's instinct than a man's reason.

Stanley Baldwin

--- वस्तुतः मी सहसा अशी उदधृते देत नाही -- पण इथे, मेंदूचा वापर करण्याच्याच स्त्री आणि पुरुष यांच्या पद्धती वेगळ्या असतात का, हा इंटरेस्टिंग विषय आहे, म्हणून दिले आहे.

May 11

काल वाढदिवसानिमित्त खूप फ्रेंडसनी मला शुभेच्छा दिल्या ! त्या आपुलकीने नक्कीच ऊर्जा मिळाली ! मी प्रत्येकाला स्वतंत्र उत्तर देत असताना, तसे करण्यासाठी, असा खूप वापर करण्यासाठी, मेसेजची सोय नाही आणि तसे केल्यास ही सोय बंदच पडू शकते, अशी चौकट आली, त्यामुळे ते थांबवले. आता सर्व फ्रेंडसना एकत्रितपणे धन्यवाद देत आहे ! सर्व फ्रेंडसना माझ्याही मनःपूर्वक शुभेच्छा !

May 10

फेसबुक हे सेफबुक ठरण्यासाठी काय काय करावे आणि काय काय करू नये ?

May 8

स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा भ्रम बाळगणारी व्यक्तीच, दुसरे कोण कसे नालायक आहेत, हे भराभर सांगते !

May 7

खूप वाचून, अभ्यास करूनच शहाणपण / परिपक्वता येते, ( किंवा येतेच ) असे काही नाही -- अत्यंत शहाणे / परिपक्व असे अंगठेबहाद्दर मी पाहिलेले आहेत. ( शहाणपण / परिपक्वता या शब्दांचे अर्थ आपल्या चर्चेत वेगवेगळे झाले आणि त्यामुळे माझी पोस्ट निरर्थक ठरली तरी मला चिंता नाही. )

May 6

विभाजन करत राहणे हा मानवी मनाचा रोगच आहे -- एखाद्याला राष्ट्रवादही त्या रोगातूनच येतो असे दिसू शकेल -- तसे झाल्यास तो गुन्हा होईल ? की त्याच्या आकलनाप्रमाणे त्याला जगता येईल ?

May 5

" सहन करणे भाग आहे " -- ही हुकूमशाहीत येऊ शकणारी भावनाच जर लोकशाहीतही जनतेच्या मनात येऊ लागली तर काय समजावा याचा अर्थ ?

May 4

जगण्यात हजार गोष्टी आहेत -- सगळे छान, परिपूर्ण असे कधीच नसते -- मन नेहमीच अपुरेपणाची, अर्धवटपणाची रडगाणी गात असते -- एक परिपूर्ण क्षण म्हणजे आपल्याला काय हवे असते ?

नातेच असे वरवरचे ठेवायचे की ब्रेकप झाला तरी फार खोल वेदना जाणवू नये -- आणि ते नाते वरवरचेच असल्यामुळे ब्रेकप होईलच, त्याबद्दल बेफिकीर राहावे !

May 3

जातीवाद नको, धार्मिक तेढ नको, लोकशाही विचारांवर चालावी ( दहशतीवर, पैशावर वा मिंधेपणावर नको ), भाषेचा अभिमान ठीक पण भाषिक वाद वा द्वेष नकोत -- हे सगळे पटणारा दुसरा देश कुठे असेल ?

May 2

Champra Deshpande shared Abhijeet Zunjarrao's photo.

"दामू केंकरे स्मृती नाट्योत्सव" मुंबई मराठी साहित्य संघातर्फे येत्या ५ मेपासून ' दामू केंकरे स्मृती नाट्योत्सव ' आयोजित करण्यात आला आहे .महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ कलावंत अमोल पालेकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी ज्योतिर्भास्कर जयंतसाळगांवकर , अजित भुरे आणि केंकरे कुटुंबीय उपस्थित राहणार आहेत . वर्ष २००६ सालापासून दामू केंकरे नाट्योत्सव साजरा केला जातो . या नाट्योत्सवासाठी प्रायोगिक संस्थेला किंवाव्यक्तीला केंकरे कुटुंबीयांतर्फे नाट्यनिर्मितीसाठी एक लाख रुपये दिले जातात . यावर्षी आलोक राजवाडे यापुणेस्थित दिग्दर्शकाला ही रक्कम देण्यात आली होती . राजवाडे यांनी डॉ . सदानंद मोरे लिखित ' शिवचरित्र ' यानाटकाची निर्मिती केली असून त्याचा शुभारंभ या नाट्योत्सवात करण्यात येणार आहे . रविवारी , ५ मे रोजी सायं . ७ . ३० वा ' शिवचरित्र ' नाटक सादर होणार आहे . सोमवारी , ६ मे रोजी रात्री ८वाजता महाराष्ट्र सेवा संघ , मुलुंड संस्थेचे ' एका गुराख्याचे महाकाव्य ' हे नाटक , मंगळवारी ७ मे रोजी रात्री ८वाजता अद्वैत मुंबई संस्थेचे ' अडगळ ' हे नाटक , बुधवारी , ८ मे रोजी रात्री ८ वाजता अभिनय कल्याण संस्थेचे 'ए , आपण चहा घ्यायचा?' हे नाटक सादर होणार आहे . नाट्योत्सवाचा समारोप गुरुवारी , ९ मे रोजीअविष्कार मुंबई संस्थेच्या ' मधल्या भिंती ' या नाटकाने होणार आहे . नाट्योत्सव रसिकांसाठी विनामूल्य असणार आहे . Chandrakant Deshpande,Neha Ashtaputre,Priya Katke,Viraj Zunjarrao,Ritesh Ghadi,Aditya Halbe,Rahul Dugal,Jaydeep Apte,Nikhil Bagoreम . टा . प्रतिनिधी , मुंबई

"दामू केंकरे स्मृती नाट्योत्सव"

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे येत्या ५ मेपासून ' दामू केंकरे स्मृती नाट्योत्सव ' आयोजित करण्यात आला आहे .महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ कलावंत अमोल पालेकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी ज्योतिर्भास्कर जयंतसाळगांवकर , अजित भुरे आणि केंकरे कुटुंबीय उपस्थित राहणार आहेत .

वर्ष २००६ सालापासून दामू केंकरे नाट्योत्सव साजरा केला जातो . या नाट्योत्सवासाठी प्रायोगिक संस्थेला किंवाव्यक्तीला केंकरे कुटुंबीयांतर्फे नाट्यनिर्मितीसाठी एक लाख रुपये दिले जातात . यावर्षी आलोक राजवाडे यापुणेस्थित दिग्दर्शकाला ही रक्कम देण्यात आली होती . राजवाडे यांनी डॉ . सदानंद मोरे लिखित ' शिवचरित्र ' यानाटकाची निर्मिती केली असून त्याचा शुभारंभ या नाट्योत्सवात करण्यात येणार आहे .

रविवारी , ५ मे रोजी सायं . ७ . ३० वा ' शिवचरित्र ' नाटक सादर होणार आहे . सोमवारी , ६ मे रोजी रात्री ८वाजता महाराष्ट्र सेवा संघ , मुलुंड संस्थेचे ' एका गुराख्याचे महाकाव्य ' हे नाटक , मंगळवारी ७ मे रोजी रात्री ८वाजता अद्वैत मुंबई संस्थेचे ' अडगळ ' हे नाटक , बुधवारी , ८ मे रोजी रात्री ८ वाजता अभिनय कल्याण संस्थेचे 'ए , आपण चहा घ्यायचा?' हे

नाटक सादर होणार आहे . नाट्योत्सवाचा समारोप गुरुवारी , ९ मे रोजीअविष्कार मुंबई संस्थेच्या ' मधल्या भिंती ' या नाटकाने होणार आहे . नाट्योत्सव रसिकांसाठी विनामूल्य असणार आहे . Chandrakant Deshpande,Neha Ashtaputre,Priya Katke,Viraj Zunjarrao,Ritesh Ghadi,Aditya Halbe,Rahul Dugal,Jaydeep Apte,Nikhil Bagoreम . टा . प्रतिनिधी , मुंबई

नफ्याची टक्केवारी किती असावी, यावर जर कुणाचे काही नियंत्रण नसेल तर किंमतीवरून दर्जा कळणार नाही. या बाबतीत ग्राहकांनी निर्णय कसे घ्यावेत ?

April 2013

April 30

चिं त्र्यं खानोलकर यांचा ' राखी पाखरू ' हा कथासंग्रह वाचला. मला त्या कथा कालबाह्य वाटल्या नाहीत. आणि सध्याच्या तथाकथित वेगाने बदलणाऱ्या वास्तवाच्या संदर्भातही अप्रस्तुत वाटल्या नाहीत.

April 27

आपल्या फ्रेंड मेधा पुजारी यांचा आजच्या 'सकाळ'च्या सप्तरंग पुरवणीतला लेख जरूर वाचा. ऑटिजमग्रस्त मुलांसाठी त्या खूप महत्त्वाचे काम करत असतात. त्यांच्या कामाला हार्दिक शुभेच्छा !

April 26

दर्जेदार दारू म्हणजे काय ? दारूच्या किंमतीवरून तिचा दर्जा कळतो का ? आणि स्वस्त दारू आणि दर्जेदार दारू यांच्या मिश्रणसेवनाने काय भलेबुरे परिणाम होतात ? जाणाकारांनी मित्रांसाठी माहिती द्यावी.

हलकेफुलके म्हणजे थोडेफार विनोदी किंवा सेक्सी -- मग असे बोलण्याला आपण नीट वाव का देत नाही ? यात कोणत्या मर्यादा अपेक्षित असतात ?

खरेपणाचे स्तोम माजवणे कमी करावे की आपण सगळे खरेच आहोत, हे भ्रमच जोपासावे आणि गृहीत धरावे आणि उगाळावे आणि त्यांचे उदात्तीकरण करत राहावे ?

April 23

सखोल समजुतीच्या दिशेने वाचनाची आवड असणे महत्त्वाचे आहे -- सगळ्यांनी विद्वान वा समीक्षक व्हायची ओझी वागवायची गरज नाही.

April 22

दारूचे व्यसनी, इतर मादक द्रव्यांचे व्यसनी, सिनेमा, संगणक मोबाईलचे व्यसनी, खरेदीचे व्यसनी, खाण्यापिण्याचे व्यसनी -- हे सगळे दिसते -- आता नवा रोग -- प्रेमव्यसनी ! आता यासाठीही व्यसनमुक्ती केंद्रे निघताहेत !

April 21

आजच्या पुणे-मटा पुरवणीत एक ' कप्प्यांचे मन ' नामक लेख आहे. समजा ब्रेक-अप झाला तर मनात तो तेवढ्या कप्प्यापुरत ठेवायचा, इतर कप्प्यांना इजा पोचू द्यायची नाही -- असे काही प्रशिक्षण यात आहे ! ' वाह क्या आयडिया है सरजी ! ' असे म्हणायची उत्तम संधी !

April 20

एकाच आयडेंटिटीने जगण्याचा कंटाळा येणे, हा आध्यात्मिक प्रश्न तर नसेल ?

April 19

एकच उदाहरण घेतले -- माणसाच्या मेंदूची रचना आणि कार्य -- हे काही माणसाच्या बुद्धीने तयार झालेले नाही -- याचाच अर्थ, याचा मूलस्रोत माणसाला कळणे शक्य नाही -- जगण्यातले गूढ आहे असे पाहण्याची माणसाला लाज वाटायचे काय कारण ?

April 18

आपण फसवले गेलो हे खरे असले तरी जे होते ते खरे धरून चालण्याचा आनंद तर मिळतच होता की !

April 17

स्त्रीला स्वातंत्र्य असावे, तिच्यावर कुणाचे स्वामित्व नसावे, स्त्री-पुरुषांत असमानता नसावी -- हे योग्यच आहे -- त्याचबरोबर पुरुषाच्या मनातली मानापमान यंत्रणाही नष्ट व्हायला हवी ! -- हे कसे साध्य व्हावे ?

April 15

पुढाऱ्यांचे, शिक्षकांचे, डॉक्टरांचे, व्यापाऱ्यांचे, बिल्डरांचे, कलाकारांचे -- असे अनेकांचे मूल्यमापन करायला माझी बुद्धी तुरूतुरू धावते -- माझे स्वतःचे मूल्यमापन कोणत्या निकषांवर व्हावे, असे मला वाटते ?

April 13

आंबेडकरांचा बुद्ध धर्म, अशा काहीशा विषयावर पुण्यात मी मे पु रेगे यांची तीन व्याख्याने ऐकली होती -- त्यांप्रमाणे ' निर्वाण ' ही कल्पना आंबेडकरांनी वगळलेली आहे, असे लक्षात आहे -- हे बरोबर आहे का ? मग दुःखमुक्ती, असे काही नसतेच, असे आंबेडकरांचे मत होते का ? जाणकारांनी प्रकाश टाकावा.

“All human beings have three lives: public, private, and secret.”
― Gabriel Garcí-a Márquez, Gabriel García Márquez: a Life
( मराठीत -- सर्व माणसांना तीन आयुष्ये आसतात --सार्वजनिक, खाजगी आणि छुपे. )

April 12

स्त्री-सौंदर्य म्हणजे काय, हे नेमके कुणीच सांगू शकणार नाही -- पण त्याहून वाईट म्हणजे तो प्रॉब्लेम का व्हावा, हेही समजत नाही ! इथे तर मैत्रिणींमध्ये, बाप रे, एकापेक्षा एक आहेत ! काय हे अजब माध्यम ! सुंदर स्त्रिया जगात खूप असतील ! पण त्यांतल्या काही आपल्या मैत्रिणी असणे ! आपण त्यांच्याशी बोलू शकणे !

April 11

समजा पाच महत्त्वाचे अस्तित्ववादी आहेत -- त्यांनी आपापल्या पद्धतीने मांडणी केलेली आहे -- कुणी देव मानणारे, कुणी देव न मानणारे ! जगातल्या एकूणच आणि विशेषतः मराठीतल्या ( मे पु रेगे धरून ) सर्व विद्वानांनी त्या पाचांचे तसे तसे मांडण्यापलीकडे काय काम केले आहे ? ' नथिंगनेस ', ' अस्तित्व ' आणि ' स्वातंत्र्य ' यांचे वेगवेगळे अर्थ आहेत का ? ही व्यक्तिवैशिष्ट्ये असतात का ? यावर प्रकाश टाकणारा महाभाग कुठे आहे का ? असल्यास तज्ज्ञांनी कृपया निदर्शनास आणावा !

सवयीच्या शुभेच्छा, सवयीचे प्रतिसाद, सवयीचे सण, सवयीची मौज, सवयीची नाती, सवयीचे सावध जगणे, सवयीची नाराजी आणि सवयीचा सात्त्विक संताप ! आणि याचबरोबर तथाकथित सर्जक अभिव्यक्तीला सवयीचा घाबरट स्व-सेन्सॉर !

April 10

आधुनिकवादी लेखकांना स्त्री-पात्रं वर्ज्य असतात असं नव्हे. लेखकांचा रोख वैश्विक ' मानवी स्थिती ' वर ( ह्यूमन कंडिशन ) असल्याने त्यांना लिंगभेद अभिप्रेत नसतो. स्त्रियांनाही अशा लिंगभेदातीत कादंबऱ्या लिहिता आल्या असत्या. परंतु स्त्रीवादी प्रश्नांमध्ये त्या मुख्यत्वाने गुंतल्याने त्यांना निखळ अस्तित्वलक्षी दृष्टिकोण महत्त्वाचा वाटत नाही. जसं, दलित लेखकांना वर्णविरहित, अस्तित्वलक्षी धाटणीने लिहिणं अगत्याचं वाटत नाही. -- पृ १३९ ' सर्जनशोध आणि लिहिता लेखक ' -- विलास सारंग.

April 9

समजा एखादा माणूस नुसते ' अ ' म्हणाला, तरीही त्यावर मतभेद, चर्चा, वाद होऊ शकतील ! ते टाळायचे असेल तर कशावर बोलावे ? विशेषतः, इथे एफबीवर ? मतभेदांचे पूर्ण -- काही वेळा कठोर -- स्वातंत्र्य देऊनही मैत्री अबाधित ठेवता यावी, असे वाटते ! मतभेद असलेल्यांची मैत्री, असेच हवे ! मते म्हणजे काही ' सत्य ' नव्हे !

April 8

ताण असह्य होऊन एकूण माणूसच तर एक दिवशी आत्महत्येला प्रवृत्त होणार नाही ?

April 6

' अस्तित्व ' प्रस्तुत आणि ' अभिनय ', कल्याण निर्मित माझ्या

' ए आपण चहा घ्यायचा ? '

या, अभिजित झुंजारराव दिग्दर्शित नाटकाचा प्रयोग, आज संध्याकाळी ०७ वाजता
सुदर्शन रंगमंच, अहिल्यादेवी शाळेजवळ, शनिवार पेठ, पुणे
इथे होत आहे.

शक्य असेल त्या सर्व फ्रेंडसनी जरूर पाहावे.

देणगी प्रवेशिका एक तास आधी हॉलवर उपलब्ध असतील.

आता माझे या क्षणी १४४३ फ्रेंडस आहेत. त्यातले समजा १४३ खोटे आयडी असतील. पण मला त्यांचा काय त्रास आहे, हे मला खरेच कळलेले नाही किंवा काय त्रास होऊ शकतो, हेही माहीत नाही. तर मी कशाची काळजी करावी ?

April 5

टिळक सुपारी खात होते -- मीही सुपारी खातो, गांधींचे अक्षर खराब होते -- माझेही अक्षर खराब आहे ! या पद्धतीने एखाद्या लेखकाला अस्तित्ववादी ठरवण्यासाठी कोणती लक्षणे दाखवावी लागतील ?

स्वच्छता !

April 4

..... तरीही माणूस कोणती ना कोणती मते बाळगतोच !

April 3

अमुक अमुक मनासारखे झाले नाही, असे रोज थोडेफार असणारच !

April 2

तोळामासा तब्येत, अधू दृष्टी, निद्रानाशाचा विकार, मनोदौर्बल्याचे झटके व अशांत गृहजीवन यांपैकी कशालाच न जुमानता नीत्शेने भरीव ग्रंथलेखन केले.
-- अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी, पृष्ठ ८९.

April 1

स्वतंत्र माणूस म्हणजे काय ?

March 2013
March 30

निराशावाद म्हणजे सत्य आणि आशावाद म्हणजे भ्रम !

March 29

सारखे गंभीर तर राहता येत नाही आणि हलकेफुलकेपणात एखादा शब्द इकडेतिकडे होण्याची भीती असते !

अहंकार तो नासा भेद ।
--- मराठीचा ग्रेट कवी तुकाराम.

March 28

चिं त्र्यं खानोलकर यांचा ' राखी पाखरू ' हा कथासंग्रह वाचला. मला त्या कथा कालबाह्य वाटल्या नाहीत. आणि सध्याच्या तथाकथित वेगाने बदलणाऱ्या वास्तवाच्या संदर्भातही अप्रस्तुत वाटल्या नाहीत.

March 27

आज आज आज आज आज

अवकाश कलामंच, पुणे प्रस्तुत
कथाभिवाचन
अभिवाचक -- प्रिया जामकर आणि सुनील गोडसे
२८ मार्च २०१३ रोजी संध्याकाळी ६ ते ८
स्थळ -- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ इमारत,
खुन्या मुरलीधर देवळासमोर,
सदाशिव पेठ, पुणे -- ३०.

प्रिय जामकर या आपल्या फेसबुक फ्रेंड आहेत, हे आपण जाणताच.
आजच !
जरूर या !

March 25

शिव्यांसह आणि धुळवडीसह होळीची परंपरा पाळल्याने होणारे पर्यावरणाचे आणि सांस्कृतिक आणि एकूणच जगण्याचे फायदे, तोटे सांगा ( ही नम्र विनंती ! )

March 24

ग्रेट ललित साहित्य हे अपौरुषेय असते !

March 23

सांस्कृतिक महत्त्वाचे ललित साहित्य, असे काही असते का, आणि कोणते ?

March 21

कुणालाच काही माहिती नाही, सगळेच समजून घेण्याच्या मनःस्थितीत आहेत, अशी चर्चा होऊ शकेल, असा विषय कोणता असू शकतो ?

बरे, ई-साहित्यसंमेलन ! स्वतःचे समग्र लेखन विनामूल्य उपलब्ध करून देणारी आणि राज्यशासनाने पारितोषिक देऊन गौरवलेली अशी, मराठीतली पहिली वेबसाईट ज्याची आहे त्याची म्हणजे माझी तिथे दखलही घेतली गेली नाही !

March 20

' टीकास्वयंवर ' पृ ११५ वर, निकष न सांगता, नेमाडे, एलियटला दुय्यम दर्जाचा साहित्यिक म्हणतात -- पण आता ई-संमेलन अध्यक्षीय भाषणात ते एलियटला मोठा कवी म्हणत आहेत !

अवकाश कलामंच, पुणे प्रस्तुत
कथाभिवाचन
अभिवाचक -- प्रिया जामकर आणि सुनील गोडसे
२८ मार्च २०१३ रोजी संध्याकाळी ६ ते ८
स्थळ -- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ इमारत,
खुन्या मुरलीधर देवळासमोर,
सदाशिव पेठ, पुणे -- ३०.

प्रिय जामकर या आपल्या फेसबुक फ्रेंड आहेत, हे आपण जाणताच.

March 19

बाथरूममध्ये पाल होती. तिला बाहेर घालवायचे प्रयत्न फेल गेले. पालीला घाव घालून मारणे, हे आमच्या घरात कुणालाच येत नाही. शेवटी नॉक ९९ फवारून मारली. या निमित्ताने एक असे कळले की समाजातला एक खूप मोठा सेक्शन पाल मारण्याचा प्रश्न सोडवू न शकणारा आहे. असे का असावे ?

नीतीच्या, आदर्श वागण्याच्या, समाजप्रिय असण्याच्या, शक्यता बदलत असतात, एवढेच नव्हे तर एकाच वेळी अनेक असतात -- तर, नेहमीचाच प्रश्न -- चांगली व्यक्ती कुणाला म्हणावे ?

March 18

कभी खुशी, कभी गम और बाकी सब डर -- बस, यही है जिंदगी ?

March 17

मानसिक अडकलेपणाच्या एखाद्या प्रश्नातून एक क्षण जरी पूर्णपणे बाहेर पडता आले तरी तो प्रश्न पुन्हा तसा पकडू शकत नाही.

March 14

छान, मोकळेपणा वाटणे आणि उकाडा, असे दिग्दर्शनात एकत्र येऊ शकत नाहीत -- मनस्ताप आणि उकाडा, असेच एकत्र असायला हवे ! म्हणजे निसर्गालाही मनस्ताप ! निसर्ग आणि माणूस यांच्यांतली एकरूपता ! वा !

माझ्या मोबाईलवर रोज सकाळी दहा वाजता येशूचा फोटो येऊन रिंग होत राहते -- बाळा, याचा मला काही उपयोग नाही, असे कळवावे म्हटले, तर हा उद्योग करणाऱ्याचा नंबर येत / दिसत नाही. याला धर्मप्रचार म्हणावे की खुळचटपणा ? असल्या प्रकारांमुळे लोकांना त्रास होईल, हे या धार्मिक लोकांना कसे कळत नाही ?

March 13

कोणत्याही मानवी संबंधात मूळ ढाचा बांधणी आवडती पक्की असली तरी काही ना काही तपशील नावडते घडत राहतात -- सगळेच मनासारखे होण्यासाठी संघर्ष करावे तर ढाच्यालाच धोका निर्माण होतो ! तर यात तारतम्य म्हणजे काय ?

पति-पत्नी संबंधात वा स्त्री-पुरुष मैत्रीत ' एकनिष्ठपणा ' हे मूल्य म्हणून आज कितपत अस्तित्वात आहे ? आणि हे मूल्य असल्यास, याचा भंग झाला असे कधी समजावे ?

समाजात जगणेच अवघड ठरावे अशा टोकाला हाव, एकाकीपणा, निराशा, दुःख हे न गेलेले मन, म्हणजे निरोगी मन, नाही का ? कुणाला कोणते रोग व्हावेत हे ज्याच्यात्याच्या जगण्याच्या घडणीत आणि पद्धतीत अध्याहृत ! हे सगळे असे इतके बंदिस्त असणारच असे गृहीत धरून जगायचे म्हणजे निराशेचा स्पीड वाढवणेच ना !

March 12

काहीजणांची मते एकमेकांशी जुळतात, काहीजणांची जुळत नाहीत -- आणि हे एकमेकांची मते समजून घेण्याचा प्रयत्न करून वा तसा प्रयत्नही न करता घडते -- तर शहाणे कोण ?

March 9

बरेचसे सगळे सवयीचे जगता येण्यात डिस्टर्बन्स कमी असला तरी कंटाळा जास्त आणि जगण्यात जानच नाही, असे नाही होणार ?

March 7

नॉर्मल चेष्टामस्करी, थोडा चावटपणा, छेडछाडही लागेलच -- निसर्ग आहे तो ! ज्या त्या स्त्रीला, जे जे ॲब्नॉर्मल वाटेल, ते टाळावे ! सक्ती नसावी !

March 6

दुःखकारक, क्लेषकारक, जे घडले ते घडून गेले, आता त्यात बदल शक्य नाही -- मग आता काय आहे प्रॉब्लेम ? त्या घडण्यामुळे मेंदूत पडलेला आणि चालू राहिलेला विकृत, त्रासदायक पीळ ! -- मग, हा पीळ जर जाऊ शकला तर काय राहील प्रॉब्लेम ?

March 4

फेसबुकचे व्यसन लागते, हा मुद्दा सोडून, आणखी कोणत्या प्रकारे हे जखडून टाकते ? खऱ्या जगण्यासारखेच व्यग्र करते ?

March 2

आपण हलकट, नीच, नालायक आहे , हे अनुभवाला येऊनही, एखाद्या व्यक्तीचे आपल्याबद्दलचे चांगले मत अबाधित राहते, हा चमत्कार नाही ?

March 1

वेळ वाया घालवणे बरे नव्हे ! होय ! पण, जातो ! खूप जातो ! काय करणार ! जगण्याच्या मूलभूत निरर्थकतेला अर्पण !

February 28

मन रिलॅक्स करण्याचा प्रयत्न मानसिक कृतीने होत असल्याने मनःस्थिति अधिकच बिघडते. शरीर रिलॅक्स झाले तर मन आपोआप रिलॅक्स होते.

February 2013

February 23

आता हयगयच नको -- उद्बोधक चर्चा करू या -- इथे एफबीवर स्त्री-पुरुष फ्रेंडसमध्ये ट्यूनिंग जमण्याची वा न जमण्याची कारणे -- हा विषय ! भले, स्त्री-फ्रेंडस सावध राहतील, बोलणारच नाहीत --

February 22

अहो, वाहने वाढल्यावरसुद्धा पार्किंग एरिया आहे तेवढाच ठेवला तर ती वाहने चालवायला जागा तरी राहील का ? पार्किंग एरिया कमीच करावा लागणार ! जनतेला अक्कल नसते, हेच खरे !

पुरुष आकर्षणाला लौकर बळी पडतो पण विश्वास कधीच टाकत नाही -- या उलट स्त्री आकर्षणाला बळी पडायला एक वेळ वेळ लावते पण नंतर विश्वास टाकणे तिला जमते ! -- हे सगळे कितपत खरे-खोटे, बरोबर-चूक ?

February 21

काही त्रासदायक घडलेले आहे, त्याच विषयावर मन अडकलेले आहे, रात्र झाली आहे, आता यावर काही घडणे वा खुलासा होणे शक्य नाही, मन तोच तोच विचारही अनेकदा करते आहे, आत्ता तर यात काहीच बदल होऊ शकत नाही, झोप उडाली आहे, काही तास असे जातात, आता झोप शक्य नाही, म्हणजे उद्याचा दिवसही खराब होणार हे नक्की आहे, तरीही मनाचे तेच चालू आहे -- अशा वेळी -- मनाचे हे अडकणे जाऊन ते प्रवाही होऊ शकेल का, हा साधा प्रश्न पडणेही अध्यात्मिक आणि टाकावू ? आणि शौर्याने तोंड देत सहन करत राहणे श्रेष्ठ ?

February 19

ड्रेनेज तुंबलेय, रस्ते चांगले नाहीयत, लोकांच्या बेकायदेशीर वागण्याने सगळीकडे ट्रॅफिक जॅम झालाय, हजारो कोटींचे घोटाळे चाललेयत, दुष्काळ आहे, परराष्ट्र धोरण बोंबललेले आहे -- असे सगळे असताना कादंबरी कसली वाचताय ?

संबंध वाईट असोत की चांगले, ते सतत बा sss रिक पद्धतीने का असे ना, मन कुरतडत असतात ! कशामुळे ? ( अशा प्रश्नांकडे पाहणे आणि ते समजून घ्यायची प्रक्रिया चालू ठेवणे, ही सांस्कृतिक कृती असते, आणि संस्कृतीचा जगण्याच्या सगळ्या क्षेत्रांशी संबंध असतो. )

February 18

' जिंदगी' आणि ' दुनिया ' यांतला कोणताच शब्द वापरलेला नाही, असे गाणेच नाही, असा एक काळ होता. या शब्दांच्या वापराने स्वतःला प्रगल्भ, परिपक्व आणि ज्ञानी वाटून घ्यायला खूप सोपे जाई. तसे वाटायची मानसिक गरज सगळ्याच काळांत असते म्हणा ! तर असे, आपण परिपक्व आहोत, असे वाटायला उपयुक्त ठरणारे ' आज ' चे मार्ग कोणते दिसतात ?

February 16

स्त्री-पुरुष मैत्रीतली दुतर्फी मान्यता ही गोष्ट तीन मिनिटांच्या सिनेगीतासारखी शक्य नसून त्यासाठी पल्लेदार रागदारीचीच तयारी लागते ! -- या सत्यात काळानुरूप काही बदल घडून आले आहेत का, की हे त्रिकालाबाधित सत्य आहे ?

एका मनाचे दुसऱ्या मनाला एक कणही काही कळू शकत नाही -- म्हणजेच ' विश्वास ', प्रतारणा ', ' खोटेपणा ' वा ' खरेपणा ' -- हे सगळे ' अंदाजे ' असते ! आणि या अंदाजे गोष्टींवर खात्रीशीर जगावे लागणे, ही जर माणसांची आणि देशांची समस्या असेल तर यावर उपाय काय असू शकतो ?

February 15

मी वेगळा -- जग वेगळे, माझा समाज वेगळा -- इतर वेगळे, माझा पक्ष वेगळा -- इतर वेगळे -- असा अलगतावाद हाच जगण्याचा पाया असणे भाग असेल तर एकूण तथाकथित मूल्यात्मकता आणि श्रेयसकल्पना यांना सोयीस्करपणाचेच रूप येणार ! समता, शांतता -- हे नुसते शब्दच ठरणार !

एकूण जगामुळेही कुणाला काही फरक पडत नाही तर फेसबुकने काय व्हायचेय ! आणि काही व्हायची गरजच काय ! इट इज जस्ट ए पार्ट ऑफ लाईफ यार !

February 14

लँडलाईन फोनला ' फोन ' म्हणणे ठीक पण मोबाईल फोनला भ्रमणध्वनी म्हणण्यापेक्षा ' मोफोन ' म्हणणे छान सुटसुटीत मराठी नाही का होणार ?

February 13

प्रेम हे निसर्गनिर्मित विशेष चमत्कार या कोटीत येत असल्याने त्याला वेळ, काळ, दिशा, मुहूर्त यांची गरज नसते !

एकाकीपणा टाळण्याचे वा तो सहन करण्याचे -- दोन्ही प्रयत्न -- मूळ अवस्था अधिक तीव्र करतात --

February 12

बऱ्याचदा तसे काहीच नसते -- आपल्याच पापी मनाचे भ्रम असतात ते नुसते !

February 8

प्रेम म्हणजे सुखतत्त्वावर आधारित आसक्ती ! ( की दुसरे काही ? ) प्रेम आहे पण स्वामित्वभावना नाही, त्यातून निर्माण होणारे क्रोध, संघर्ष नाहीत, असे शक्य आहे ? यात काही आदर्श परिस्थिती असू शकते का ?

February 7

पाउलो कोएलो ची ' एलेव्हन मिनिटस ' ही अनुवादित कादंबरी वाचली ! ग्रेट काम ! शिवाय ' माहिती कम ' लोकांसाठी लैंगिक शिक्षण म्हणूनही उपयुक्त !

February 6

काहीच कायम टिकणारे नाही -- प्रत्येक गोष्ट क्षणोक्षणी बदलत आहे -- हे आपल्या साध्या बुद्धीलाही पटणारे सत्य आहे. माणसाने या सत्यामुळे कायम बौद्धिक भीती भोगत राहावे ? की याकडे दुर्लक्ष करत जगणे जमवावे ?

February 5

चॅटिंग इंटरेस्टिंग कशामुळे होते आणि बोअरिंग कशामुळे होते ? ( एकमेकांच्या अनुभवांतून शिकूनच घेऊ या ना ! )

February 4

एक तरुण भेटला. " चॅटिंग म्हणजे एक संकटच आहे, " म्हणाला. म्हटले, " का रे ? " तर म्हणाला, " अहो, आय लव्ह यू -- असे किती वेळा म्हणायचे ? आणि दुसरे म्हणायचे तरी काय ? " म्हटले, " एक कालातीत सत्य आहे -- उपयोग झाला तर बघ. " " सांगा, " तो म्हणाला. " अरे, " " म्हटले, " प्रेम व्यक्त करण्यासाठी प्रेमाचेच बोलावे लागते, असे नाही -- काहीही प्रेमाने बोलायचे, की झाले ! प्रेम जाणवत राहिले म्हणजे झाले ! " " हं, पटतेय, " तो म्हणाला. " नुसते प्रेमाचे बोलण्यापेक्षा हे जास्त इफेक्टिव्ह होईल ! " इथे हे संभाषण संपले. पिढीतला फरक असूनही तो, " पटतेय, " म्हणाला खरा !

खूप झाला गंभीरपणा -- आता हे घ्या --
स्त्रियांना प्रेम नुसते स्पर्शातून नव्हे तर शब्दांतून व्यक्त झालेलेही खूप आवडते, असे वाचनात आले -- यासाठी तरी भाषेवर प्रेम नको ? स्त्रियांचे आणि पुरुषांचेही ?

February 1

एका मर्यादेनंतर, भाषेच्या वापराने, मानवी संबंधातला एखादा प्रश्न, समजायच्या ऐवजी अधिक जटिल व्हायला लागतो !

January 2013
January 27

मन उथळ टिवल्याबावल्यांत रमणे आणि मन नात्यांच्या गंभीर गुंतागुंतींचा विचार करण्यात व्यग्र असणे, या दोन्हींत मूल्यात्मक कोणता फरक असतो ?

January 24

आपल्या कृतीचे काय परिणाम घडू शकतील, याच्या अंदाजातच आपण वागत / बोलत असतो. असा कंट्रोल सुटलेल्या घटना सोडा, पण असा कंट्रोल असलेल्या घटनांतली अनपेक्षितताही टाळता येत नाही. तुरुंगवासापर्यंतही गाडी जाऊ शकते !

January 19

आधी मैत्री, मग भेट ! फेसबुकची किमया ! आज सकाळी आम्ही ७-८ एफबी फ्रेंडस भेटणार ! आजकी सुबह फ्रेंडसके नाम !

January 18

फ्रेंडस, गेले काही दिवस संध्याकाळनंतर मला सारखे नेटचे प्रॉब्लेम्स येताहेत -- तक्रार दिलेली आहे -- पण कुणी काही बोलले, मी उत्तरच दिले नाही, असे होऊ / दिसू शकते -- कृपया गैरसमज नसावा.

Champra Deshpande shared a link.

Champra Lekhan

champralekhan.com

आपल्या मराठीतली एक गंमत सांगतो. माझी फारशी पुस्तके नाहीत, वर्तमानपत्री लेखन सोडता, माझ्यावर कुणा समीक्षकाचे काही म्हणणे नाही ( माझ्या www.champralekhan.com या वेबसाईटवर सगळे लेखन मोफत उपलब्ध असूनही ) -- त्यामुळे दखल घेणे कमी -- काही महत्त्वाचे पुरस्कार न मिळणे -- हे सगळे ठीक -- त्याबद्दल तक्रार नाही ! पण अशा नगण्य लेखकाला विचारले जाते की हा पन्नास हजारांचा, हा लाखाचा पुरस्कार कुणाला द्यावा, ते नाव सुचवा !

January 14

मोठी उत्तेजकता जाऊ द्या, एखाद्या स्त्रीच्या अंगावरच्या साडीच्या पदर-स्पर्शाने वा तिने केस मागे टाकताना आलेल्या किंचित झुळुकीच्या स्पर्शानेही एखादा पुरुष उत्तेजित होऊ शकतो. कोणत्या पुरुषाचे असे होऊ शकेल, याचे नियम कुणालाच माहिती नाहीत. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर, जनुकनकाशात योग्य ते बदल करून, सगळ्याच पुरुषांतली ही प्रक्रिया बंद पाडता येईल का, याचे संशोधन का करू नये ? भयानक घटना घडल्यावर नपुंसकीकरणावर चर्चा करण्यापेक्षा या प्रिव्हेंटिव्ह उपायासाठीही प्रयत्न का करू नयेत ? अमुक प्रमाणाच्या बाहेर त्याने उत्तेजित होऊच नये, अशी वेगमर्यादा त्याच्या ॲक्सेलरेटरला बसवता येईल का ? मानवी संशोधनाचे एकूण यश पाहता, हे अशक्य वाटत नाही. ( योग्य वेळी ही वेगमर्यादा, एखादी गोळी घेऊन, काढता यावी, फार तर ! )

January 13

आपले मित्र अभिजित झुंजारराव आणि ' अभिनय ', कल्याणची पूर्ण टीम -- झिंदाबाद !!!

( मी असे का म्हणतो आहे, ते लौकरच अभिजितकडून सविस्तर कळेल ! )

तोकडे कपडे, अंगप्रदर्शन, आकर्षक मेकप इत्यादींनी थोडे आकर्षण वाटणे, छान वाटणे इतपत ठीक आहे, पण उद्दीपित होऊन, लैंगिक भावनेचा भडका उडून पुढच्या कृती कुणाही पुरुषाकडून होऊ नयेत, हे बरोबरच आहे. म्हणजे चुकतेय कुठे ? पुरुषाच्या मनात. तशी प्रक्रिया घडू नये म्हणून पुरुषाच्या मनातच बदल घडायला हवा आहे. तो संस्कारांनी घडवावा म्हटले तर शुभंकरोतीचा काही उपयोग होताना दिसत नाही, शिवाय स्वतःच बिघडलेले लोक संस्कार कसले करणार ? आणि बदल तर सगळ्याच पुरुषांत व्हायला हवाय, कारण प्रक्रियेचे स्वरूप सगळीकडे तेच आहे, काही मने ते दडपू शकताहेत, इतकेच. असे जर आहे तर हा पुरुषांमध्ये अपेक्षित असलेला मानसिक बदल कसा घडून येईल, याचा विचार व्हायला हवा. तो घडताना फारसा दिसत नाही. धुरीण म्हणा, नीतीतज्ञ म्हणा, मानसतज्ञ म्हणा यांनी यावर बोलायला हवे. की या मुख्य विषयातलेच कुणाला काही समजत नसेल ?

January 10

कित्येक गुन्हेगारी, हिंसक, क्रूर घटना घडताहेत -- त्या थोपवल्या पाहिजेत यावर एकमत असले तरी अनेकांना सुचणारे मार्ग वेगवेगळे आहेत -- लोकशाही वा हुकुमशाही मार्गाने, प्रत्येक प्रश्नावर त्यांतला एकेक उपाय निवडून ट्राय करणे, याहून जास्त काय शक्य आहे ?

January 5

नेहा जोशी या आपल्या फ्रेंडच्या निमंत्रणावरून काल ' बेचकी ' या नाटकाचा पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग पाहिला. तुडुंब गर्दी होती -- प्रसाद ओक किती लोकप्रिय आहे याचा तो पुरावाच होता. एकूण टीमच छान होती आणि प्रयोग पक्का बांधलेला आणि अर्थातच अति- नाट्यमय करमणूक करणारा होता. लोकांचे पैसे वसूल होतात, यात शंका नाही. या निमित्ताने माझ्या जुन्या ओळखीचे कलाकार अभय राणे आणि स्वरूपा खोपकर हेही भेटले याचा आनंद झाला. तेही या नाटकात कामे करतात. प्रसाद तर जानामाना अभिनेता असून तो प्रेक्षकांना तृप्त करतो, यात नवल नाही. मुख्य म्हणजे, आपली फ्रॅंड नेहा ! भरपूर व्हरायटी असलेला तिचा रोल आहे. साध्या, जणू दबलेल्या स्त्रीपासून ते कामांध होऊन वेडीपिशी झालेली स्त्री अशा असंख्य अवस्था ती जबरदस्त ताकदीने व्यक्त करते ! तिची संवादफेक आणि आवाजाचा वापर विलक्षण परिणाम साधणारे आहेत ! मराठी रंगभूमीला आणि एकूण अभिनयकला जगताला ही एक समर्थ अभिनेत्री मिळाली आहे, हे निश्चित !
धन्यवाद नेहा !

January 4

अभिजित झुंजाररावने माझे ' ए, आपण चहा घ्यायचा ? ' हे नाटक त्याच्या ' अभिनय, कल्याण ' या संस्थेतर्फे आणलेले असून त्याचे प्रयोग सुरू आहेत. त्यात अभिजितने माझ्या संहितेत न दिलेला एक क्षण असा बसवला आहे की सॅल्यूटच ठोकावा ! त्या एका क्षणात नाटकाचा पूर्ण आशय व्यक्त होण्याची किमया घडते. त्याबद्दल माझी दिलखुलास दाद मी दिलेलीच आहे. त्या क्षणासाठीसुद्धा हे नाटक पाहावे, इतके परिपक्व काम दिसते ! पूर्ण टीमचे अभिनंदन !

--- ००० ---